## प्रकरण पहिले

# श्रीसंत मारुती महाराजांचे जीवनचरित्र काल आणि कर्तृत्व

### प्रस्तावना

मराठी साहित्य क्षेत्रात संत वाङ्मयाचे स्थान अनन्य साधारण आहे. श्रीज्ञानदेवांपासून आजतागायत महाराष्ट्र भूमीत होऊन गेलेल्या संतांनी आपल्या साहित्यातून जनसामान्यांना मोलाचे मार्गदर्शन केले आहे. ही उज्ज्वल परंपरा अनेक संतांनी (संत गुलाबराव महाराज, संत तुकडोजी महाराज, संत दासगणू महाराज, बाबा महाराज आर्वीकर, स्वामी स्वरूपानंद आदी) आपल्या कर्तृत्वाने व साहित्य निर्मितीने आधुनिक कालातही जिवंत ठेवली आहे. ती मध्ये माकनेर क्षेत्री जन्मलेले (जन्म इ. स. १८९६ व समाधी इ. स. १९४८) श्रीसंत मारुती महाराज माकनेरकर यांची वाङ्मय निर्मिती उठून दिसणारी आहे. अभंग गाथा (सुमारे तीन हजार अभंग), आध्यात्मिक कीर्तने (सुमारे पाचशे कीर्तने), हिंदी अभंग गाथा (सुमारे दोनशे अभंग), गीतार्थदीपिका (भगवद्गीतेचा अभंगात्मक अनुवाद: सुमारे सातशे अभंग) तसेच मराठी व हिंदी भाषेतील श्रीकृष्ण व श्रीराम चरित्र इत्यादी ग्रंथांद्वारे त्यांनी जनसामान्यांना मोलाचे मार्गदर्शन केले आहे. ही वाङ्मय निर्मिती विचारवैभवाने तसेच काव्यगुणांनी संपन्न आहे. तसेच तिचे स्वरूपही वैविध्यपूर्ण आहे. आत्मचरित्र, सत्यअध्यात्म (तत्त्वचिंतनपर आठ व्याख्याने), नमनगीत, बोधपर निबंध अथवा उपदेशपर गोष्टी, औषधी संग्रह, संसार सुधारणा, आर्यसमाज सणांची सुधारणा, उपदेशपर म्हणी ही त्यांची अन्य स्फुट रचना आहे. या सर्वच रचना त्यांच्या अभिजात व प्रसन्न कवित्वाने संपन्न आहेत. आध्यात्मिकता, सामाजिकता आणि चिंतनशीलता ही तिची वैशिष्ट्ये आहेत. म्हणून आधुनक काळातील एका प्रतिभाशाली संताच्या उपरोक्त वाङ्मयनिर्मितीचा संशोधनात्मक अभ्यास आवश्यक ठरतो.

सौ. स्मिता विनायक कुलकर्णी यांनी १९९८ रोजी श्रीसंत मारुती महाराज माकनेरकर: व्यक्ती आणि वाङ्मय हा प्रबंध पुणे विद्यापीठाला सादर केला होता. पण माकनेरकर

महाराजांचे जीवनचरित्र लिहिताना त्यांच्या ओवीबद्ध चरित्राचा उपयोग केलेला नाही. मात्र प्रस्तुत प्रबंधात या ग्रंथाचा उपयोग केला आहे. त्यामुळे प्रस्तूत शोध प्रबंधातील चरित्रामुळे महाराजांच्या जीवनातील अनेक महत्त्वाच्या पैलूवर प्रकाश पडतो.

डॉ. स्मिता कुलकर्णी यांनी रामचरित्र, कृष्णचरित्र, गीतार्थदीपिका या ग्रंथांना संकीर्ण वाङ्मयात घालून त्यांचा त्रोटक अभ्यास मांडला आहे. वास्तविक हे स्वतंत्र ग्रंथ आहेत. मात्र प्रस्तुत प्रबंधामध्ये सदर ग्रंथांचा सविस्तर अभ्यास मांडलेला आहे. यासाठी स्वतंत्र अशी दोन प्रकरणे दिली आहेत. हे प्रस्तुत संशोधनाचे वेगळेपण म्हणता येईल. तसेच डॉ. स्मिता कुलकर्णी यांनी महाराजांच्या हिंदी अभंगांचा फारचा विचार केलेला नाही. पण प्रस्तुत प्रबंधात हिंदी अभंगांचा सविस्तर विचार केलेला आहे, यावरुन प्रस्तूत शोध प्रबंधाचे वेगळेपण लक्षात येते.

**तेरावे शतक आणि सामाजिक परिस्थिती**

इ. स. ५ व्या शतकापासून गौतम बुद्धांच्या बौद्ध तत्त्वज्ञानाचा प्रभाव हळूहळू कमी होत गेला आणि त्याचा परिणाम म्हणून वैदिक धर्माचे पुनरुज्जीवन सुरू झाले. चालुक्याच्या काळात तर यामध्ये दुपटीने विशेष प्रयत्न झाल्याचे आढळते. तत्कालीन शंकराचार्यांची या कामात मोठीच मदत झाल्याचे आढळते. वैदिक धर्माच्या पुनरुज्जीवनामुळे धर्माच्या बाह्य उपचारावर, कर्मकाडांवर विशेष भर देण्यात येऊ लागला. यादवकाळात तर वैदिक धर्माच्या पुनरुज्जीवनाच्या दृष्टीने यथायोग्य संधी निर्माण केली गेली. ज्योतिष, वेदांत, धर्मशास्त्र, संगीत इ. शास्त्रांवर टीकात्मक लेखन होऊ लागले. हेमाद्री पंडित, बोपदेव इ. ग्रंथलेखन करून धर्माचारांना महत्त्वाचे स्थान दिले. 'चतुवर्ग चिंतामणी' यासारख्या ग्रंथाचे लेखन हेमाद्री पंडितांनी करून व्रतवैकल्ये, अनुष्ठाने यांचे सांगोपांग वर्णन केलेले दिसते.

विजयनगरच्या राजाश्रयाखाली स्थापत्यकलेचा प्रचंड विकास झाला. नवनवीन प्रचंड मंदिरे बांधण्यात आली. यज्ञसंस्थांचे पुनरुज्जीवन केले गेले. धार्मिक कर्मकांडांना खूप महत्त्व देण्यात आले.

या साऱ्या प्रकारांमुळे मूठभर लोकांना प्रतिष्ठा प्राप्त झाली. समाजातील सधन वर्ग, राजे-रजवाडे दानधर्म, ब्राह्मण भोजने यातच गुंतला. भोजन, यज्ञयाग यांसारख्या अनुत्पादक गोष्टींमुळे समाजाची आर्थिक स्थिती खालावत गेली. सामान्य मनुष्य खऱ्या धर्मापासून दूर होत गेला. त्याची आध्यात्मिक कुचंबणा होऊ लागली. सर्वसामान्यांचे भौतिक जीवन अनेक संकटांनी व्यापले गेले. लढाया, लूटमार, निसर्गाचा अनियमितपणा यांमुळे शेतकरी व सर्वसामान्यजन अस्मानी-सुलतानी संकटाच्या भोवऱ्यात सापडले गेले. समाजाच्या या अनिश्चिततेचे वर्णन करताना डॉ. गं. बा. सरदार म्हणतात, ''वैदिक परंपरा निष्प्रभ झाली होती. बदलत्या परिस्थितीप्रमाणे समाजाला नवी प्रेरणा देण्याचे सामर्थ्य या धर्मसंस्थेत उरले नव्हते, म्हणूनच अवघ्या पंचवीस वर्षांत दक्षिणेतील बहुतेक हिंदू राज्ये परधर्मीय आक्रमकांना खालसा करता आली. यज्ञयाग, व्रतवैकल्ये, जपजाप्य एवढ्यापुरतेच धर्मभावनेचे क्षेत्र अंकुचित बनले होते. कर्मकांडांचे अवास्तव बंड माजल्यामुळे नैतिक मूल्यांची चाड राहिली नव्हती. उच्चवर्णीयांच्याबाबत सुखासीनतेची व भोगविलासाची प्रवृत्ती वाढली होती. ब्राह्मण व क्षत्रीय कर्तव्यपराङमुख झाले होते. यादवांच्या राजवटीत वैदिक विद्येला भरपूर आश्रय होता. ठरावीक चाकोरीतून जुन्या ग्रंथांचे चर्वितचर्वण करण्यापलीकडे या पंडितांच्या हातून काही विशेष कामगिरी झाली नव्हती. विज्ञानेश्वारापासून हेमाद्रीपर्यंतच्या काळात वैदिक परंपरेत धर्मसुधारणेच्या जिवंत प्रेरणेपेक्षा पुनरुज्जीवनाची निस्तेज प्रवृत्तीच दिसून येते. रामदेवरावसारख्या धनिकांनी पंढरपूर देवालयाचा जीर्णोद्धार करण्याचा उपक्रम केला आणि विज्ञानेश्वर व हेमाद्री यांसारख्या पंडितांनी स्मृतिग्रंथांवर टीका लिहून आचार धर्माची विस्कटत चाललेली घडी पुन्हा नीट बसविण्याची खटपट आरंभली. तुकारामांच्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे,

**अर्थे लोपली पुराणे। नाश केला शब्द ज्ञाने ।।**
**विषम लोभी मनें। साधनें बुडविली ।।** [१]

अशा तऱ्हेची सनातन धर्माची अवस्था त्याकाळी झाली होती. सर्वसामान्य जनता जोखाई, मरीआई, सखाई यांना कोंबड्या, बकऱ्यांचे बळी देऊन त्यांना प्रसन्न करून घेण्यात गुंतली होती. तर उच्चवर्णिय धर्माच्या नावाखाली उपभोग घेणाऱ्या कर्मकांडात गुंतले होते. अशा या दिशाहीन अवस्थेचे वर्णन करतांना इतिहासाचार्य वि. का. राजवाडे म्हणतात, ''यादवांच्या आमदानीत म्हणजे इ. स. च्या तेराव्या शतकाच्या उत्तरार्धात मराठ्यांचे लक्ष परमार्थ्याच्या नावावर ऐच्छिक उपभोग घेण्याकडे लागले होते.''[२]

### भक्तिपंथांच्या धार्मिक सुधारणा

गढूळलेले समाजजीवन स्वच्छ करून समाजमनाच्या जीवनात सद्‌विचारांची पेरणी करण्यासाठी त्या काळात जैन, लिंगायत, महानुभाव, वारकरी, नाथपंथ आदी पंथांनी आपापल्यापरीने प्रयत्न सुरू केले. दुर्दैवांने पंथीय विश्वात्मकता निर्माण होण्याऐवजी पंथीय सांप्रदायिकता निर्माण झाली. त्यामुळे जैन, लिंगायत, नाथपंथ, महानुभाव या पंथांनी सुरू केलेली समाजातील धर्मशुद्धतेची चळवळ मर्यादित होत गेली. पंथीय श्रेष्ठत्वाखाली आपापसात झगडे होऊ लागले. या स्थितीचे वर्णन करताना गं. बा. सरदार म्हणतात, ''अज्ञानाने, भीतीने किंवा स्वार्थ बुद्धिने मंगळाई, जोखाई, म्हसोबा, बहिरोबा इत्यादी देवतांची भक्ती करण्यापलीकडे मजल न गेलेला बहुसंख्य बहुजन समाज अधिकच गोंधळून गेला.''[३] अशा गोंधळलेल्या बहुजन समाजाला स्थिर करून त्याला आत्मोन्नतीच्या मार्गाकडे नेण्याचे मोठे कार्य आपल्या सर्वसंग्राहक वृत्तीने समाजाच्या तळागाळात पोहोचलेल्या वारकरी पंथाने केले.

### वारकरी पंथाची सर्वव्यापी कामगिरी

महाराष्ट्राच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचा विचार करता इ. १२०६ ते १५१८ अखेर देवगिरीचे यादव, बहामनी सुलतान, निजामशाही व आदिलशाही यांच्या अंमलाखाली महाराष्ट्राच्या राजकीय स्थितीची वाटचाल झालेली दिसते. पैकी देवगिरीच्या यादवांची राजवट सोडता इतरांच्याकडून महाराष्ट्राला अन्यायाची वागणूक मिळाल्याची दिसते. याच दरम्यान

महाराष्ट्रात दोन महत्त्वपूर्ण सांस्कृतिक घटना घडल्या, पैकी एक म्हणजे मराठीभाषेचा विकास झाला व तिच्यामध्ये दर्जेदार साहित्याची निर्मिती सुरू झाली. दुसरी म्हणजे ज्या संतमंडळांनी लोकाभिमुख साहित्याची निर्मिती केली. त्यांनीच सर्वसंग्राहक दृष्टी बाळगणाऱ्या वारकरी संप्रदायाची स्थापना करून, समाजातल्या शेवटच्या घटकापर्यंत समतेची ध्वजा फडकविली. त्यामुळेच, ''खटनट यावे । शुद्ध होऊनि जावे । दवंडी पिटी भावे चोखा मेळा।'' अशा प्रकारची दवंडी चोखामेळा पिटू शकला व आठरापगड जातींना-आध्यात्मिक क्षेत्रात समान दर्जा असल्याचे सांगू शकला ते वारकरी पंथामुळे. म्हणून हा पंथ समाजात सर्वदूर पसरला. ''विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म । भेदाभेद भ्रम अमंगळ'' या विचारांचा पुरस्कार करीत वारकरी संप्रदायाने महाराष्ट्रातील सर्व सामाजिक स्थित्यंतराच्यामध्ये क्रांती घडवून आणली. सर्व जातीधर्मातील लोकांना परमेश्वराच्या नामस्मरणाचा तसेच स्वत:च्या सर्वांगीण उद्धाराचा अधिकार आहे. धर्म, भक्तीच्या क्षेत्रात स्त्री-पुरुष, स्पृश्य-अस्पृश्य असा भेदभाव नाही हे पटवून दिले.

तत्कालीन इतर पंथाच्या तुलनेत राजाश्रयापेक्षा लोकाश्रयाला वारकरी पंथाने अधिक महत्त्व दिले. मठांच्या उठाठेवींच्या भानगडीत न पडता प्रत्येक व्यक्तीचे अंत:करण हाच एक प्रासाद असून त्या प्रासादातील वाईट विचारांची जळमटे काढून सद्विचारांची, आचारांची मंगल तोरणे बांधणे वारकरी पंथाने इष्ट मानले. मठांच्या निर्मितीपेक्षा माणूस निर्मितीचे कार्य या पंथाने महत्त्वाचे मानले. त्यामुळे वारकरी पंथ सर्वसामान्यांच्यात रुजला. त्यामुळेच गं. बा. सरदार म्हणतात, 'वारकरी पंथाजवळ विचारांचे वैभव कमी नव्हतेच, पण भावनेचे ऐश्वर्यही अपार होते. निष्ठा, त्याग, धैर्य, सहिष्णुता, उदारता इत्यादी गुणांनी त्यांनी लोकांची मने वेधून घेतली.' [४]

**वारकरी पंथातील संत प्रभावळ**

मानवतावादी अशा वारकरी संप्रदायाच्या संस्कारशील अशा लोकपीठात आदर्श मानवी समाजाची निर्मितीप्रक्रिया सुरू झाली होती. हा समाजहितपर प्रयोगशील उपक्रम

संतज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम या संतमंडळींनी समाजाची गरज ओळखून नव्या तंत्राचा वापर करीत समाज सुधारणेचा मंत्र एका संतपिढीकडून दुसऱ्या संतपिढीकडे पोहोचविला. अशा या प्रभावशाली वारकरी पंथातील संतप्रभावळीचा साररूपाने पुढीलप्रमाणे परिचय करून घेता येईल.

**संत ज्ञानेश्वर**

वारकरी पंथातील सर्वस्पर्शी व्यक्तिमत्त्व म्हणजे संत ज्ञानेश्वर होत. तत्कालीन समाज हा धार्मिक कर्मकांडे, अंधश्रद्धा, व्रतवैकल्ये, जातीयता यांसारख्या अनेक समस्यांच्या गर्तेत सापडलेला होता. अशावेळी ज्ञानदेवांनी ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, चांगदेव पासष्टी हरिपाठाचे अभंग अशी अभंग रचना केली. आध्यात्मिक तत्त्वज्ञान सोप्या मराठीत सांगितले. मराठी भाषेला ऐश्वर्य प्राप्त करून दिलेच, पण त्याचबरोबर 'कुळ जातिवर्ण । हे अवघेचि गा अकारण।' असे म्हणत सर्वसामान्य माणसाला त्याचा हरवलेला स्वाभिमान परत मिळवून दिला. वेदविद्येचा अधिकार पददलितांपर्यंत पोहोचता केला. त्यामुळेच त्यांच्या कर्तृत्वसंपन्न नेतृत्वाखाली अनेक संतांची मालिका निर्माण झाली. चंद्रभागेच्या वाळवंटात रमलेला वारकरी संप्रदाय विश्वात्मक पातळी गाठू शकला. म्हणूनच 'ज्ञानदेवे रचला पाया । उभारले देवालया' असे संत बहिणाबाईंनी अभिमानपूर्वक म्हटले आहे.

**संत नामदेव**

संत ज्ञानेश्वरांच्या संस्कारशील प्रभावळीत पांडुरंगाच्या भक्तापासून कुशल संघटकापर्यंत यशस्वी प्रवास करणारे 'देव भावाचा भुकेला । याति कळेनाही त्याला' असे म्हणत परमेश्वराच्या नामभक्तीचा सर्वांना अधिकार आहे, असे सांगणारे संत नामदेव वारकरी पंथातील आघाडीचे संघटक व चरित्रकार होते.

'आम्हा सापडले वर्म । करू भागवत धर्म' असे म्हणत त्यांनी ज्ञानेश्वरांच्या भागवत धर्माची पताका पंजाबपर्यंत सर्वदूर फडकवत ठेवली. 'नाचू कीर्तनाचे रंगी। ज्ञानदीप लावू जगी।' असे म्हणत जनसामान्यांचे प्रबोधन केले.

संत गोरा कुंभार, सेना न्हावी, सावता माळी, नरहरी सोनार, चोखामेळा, परिसा भागवत, विसोबा खेचर, मुक्ताबाई, जनाबाई, जोगा परमानंद, जगन्मित्रा नागा अशा समाजाच्या सर्व घटकांतील संतांची एकत्रित अशी बांधणी करण्याचे महत्त्वपूर्ण काम संत नामदेवांनी केलेले आपणास दिसून येईल.

**संत एकनाथ**

इस्लामी राजवटीच्या काळात महाराष्ट्रात सांस्कृतिक एकात्मता टिकविणारे महान लोकसंत म्हणून एकनाथांच्याकडे आपणास पाहावयास लागते. चतु:श्लोकी भागवत, एकनाथी भागवत, भावार्थ रामायण, रुक्मिणी स्वयंवर, पदे, गौळणी व भारुडे यांसारख्या ग्रंथरचना करीत महाराष्ट्र व मराठी भाषा यांची अस्मिता नाथांनी ठळकपणे अधोरेखित केली. नाथांनी केलेली विपुल रचना ही केवळ विद्वानांसाठी नव्हती, तर ती तळागाळातल्या सर्व – सामान्यांसाठी होती. आपल्या साहित्यातून आध्यात्म व भक्ती यांचे धडे देत समाजातील अंधश्रद्धा, अस्पृश्यता, कर्मकांड यांच्यावर त्यांनी हल्ले चढविले.

**संत तुकाराम**

भागवत धर्माच्या 'कळसा' पर्यंत पोहोचण्याचे कृतिशील भाग्य लाभलेले संत म्हणजे संत तुकाराम हे होत. आपल्या अभंगवाणीतून संत ज्ञानदेवांपासून ते एकनाथांच्यापर्यंतच्या तत्त्वज्ञानाचा पुरस्कार तर त्यांनी केलाच, पण आपली मते परखडपणे मांडून स्वत:चे वेगळेपण त्यांनी सिद्ध केलेले आपणास दिसून येईल. खरा संत कसा असावा? भक्त म्हणजे काय? वेदांचा मूळ अर्थ कोणता? नाममहात्म्य, संतांचा धर्म अशा अनेक प्रश्नांबाबत आपली परखड मते मांडत आध्यात्म, भक्ती व व्यवहार यांची सुरेख सांगड घालत त्यांनी समाजाचे प्रबोधन केले.

**समर्थ रामदास**

तुकाराम महाराजांच्या समकालीन महाष्ट्रातील एक महत्त्वाचे संतपुरुष म्हणून रामदासांकडे पाहिले जाते. चोवीस पिढ्यांची राम उपासना असणाऱ्या 'जांब' येथील 'ठोसर'

घराण्यात रामदासांचा जन्म झाला. बालपणापासूनच त्यांना ईश्वर भक्तीची ओढ व सत्संगाची आवड होती. मूळच्या वैराग्यवृत्तीमुळे ऐन लग्नाच्यावेळी ते घरातून पळून गेले. गोदावरीच्या पुण्य परिसरात टाकळी येथे बारा वर्षे राहून त्यांनी तपश्चर्या केली व पुढील बारा वर्षे भारतखंडाची तीर्थयात्रा केली. लोकास्थितीचे निरीक्षण केले. म्हणूनच डॉ प्र. न. जोशी म्हणतात, ''उभ्या हिंदुस्थानात भ्रमण करून लोक स्थितीचे हृदय विदारक वर्णन करणारा समर्थांएवढा दुसरा पुरुष नाही''[५] या तीर्थयात्रेमुळे जनसमाजाची झालेली दैना त्यांच्या लक्षात आली. या लोकांचे दैन्य दूर करावे, त्यांचे आत्मभान जागृत करावे या उद्देशाने समर्थ संप्रदायाची उभारणी केली. श्रीरामाची, हनुमंताची बलशाली उपासना सुरू करून लोकजागृती सुरू केली. शिष्यांची फौज उभा करून भवानी मातेचे प्रेरकरूप स्पष्ट करीत गावोगावी प्रचार करीत देश, धर्म, संस्कृती याविषयी जनमानसात अभिमान तेवत ठेवला.

संत बहिणाबाई, वेणाबाई, निळोबाच्या मार्फत संतपरंपरा पुढे चालू राहिली. त्यातूनच पुढे अर्वाचीन कालखंडातही अनेक संत जन्मास आले व त्यांनी संतांचे धर्म जागृतीचे, प्रबोधनाचे कार्य सुरू ठेवले. ही परंपरा आजही आपणास पाहावयास मिळते. आज तर वारकरी संप्रदायाला अधिकाधिक व्यापक रूप प्राप्त झाले आहे. पंढरीची आषाढी-कार्तिकीची वारी हे याचे उत्तम उदाहरण आहे. वारकरी संप्रदाय हा महाराष्ट्र संस्कृतीचा एक अविभाज्य भाग आहे. मात्र वारकरी संप्रदायाला हे स्वरूप एकदम प्राप्त झाले नाही. त्यासाठी अर्वाचीन काळातील अनेक संतांनी आपल्या वाङ्मयांद्वारे व कथाकीर्तनाद्वारे हा संप्रदाय सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचविला व संतांची ही परंपरा अखंड तेवत ठेवली. मारुती महाराज माकनेरकर हे त्या परंपरेचा एक वारसदार आहेत. म्हणूनच पुढे अर्वाचीन संत परंपरेचा ओझरता परिचय येथे करून दिला असून, त्यानंतर माकनेरकर महाराजांच्या चरित्राचा अर्थात कार्यकर्तृत्वाचा आढावा घेतला आहे.

**अर्वाचीन कालखंडातील संत परंपरा**

इ. स. १८१८ ला पेशवाई बुडाली आणि इंग्रजी राज्यसत्तेला सुरुवात झाली.एका अर्थी भारतीय आणि महाराष्ट्राच्या अस्मितेला उतरती कळा लागली असे म्हणता येईल. इंग्रज भारतात आले. ते येताना आपली संस्कृती घेऊन आले आणि साहजिकच अनुकरणप्रियेतून त्यांची भाषा, पोशाख, खाण्या-पिण्याच्या सवयी, सभ्यता व प्रशासकीय सेवा मनोवृत्ती वाढीस लागली.

इंग्रजी भाषेच्या ज्ञानाने पाश्चिमात्य विचारांची कवाडे उघडली गेली. तुलनेने आपल्याकडील समाजव्यवस्थेतील वर्णव्यवस्था, जातिव्यवस्था, रूढीपरंपरा, तत्त्वज्ञान यातील मर्यादा जाणवू लागल्या व यातूनच 'ब्राह्मो समाज, प्रार्थना समाज, आर्य समाज, सत्यशोधक चळवळ यांसारख्या सुधारणावादी विचारसरणीच्या चळवळी सुरू झाल्या. आपल्या समाजजीवनाचे अधिष्ठान असणारा धर्म समाजाला सर्व बाजूंनी बांधून घालणारा होता आणि दुसऱ्या बाजूला धर्मक्षेत्राच्या बाबतीत स्वातंत्र्यही होते. या संदर्भात डॉ. र. बा. मंचरकर म्हणतात, 'तत्कालीन जीवनात धर्म हेच स्वातंत्र्याचे एकुलते एक क्षेत्र होते. द्रोण उलटा ठेवावा की पालथा येथपासून ते ईश्वर मानावा की मानू नये येथपर्यंत कडाक्याचे वाद होऊ शकत होते ते धर्मक्षेत्रातच.''[६] अशा या धर्मक्षेत्रामध्ये कालपरत्वे बदल घडवून आणला पाहिजे असे या चळवळीमधील लोकांना वाटू लागले व त्या दृष्टीने लोकहितवादीसारख्या मंडळींनी प्रयत्न सुरू ठेवले. म्हणूनच भास्कर लक्ष्मण भोळे यांचे या संदर्भातील लोकहितवादींच्या बाबतीतील उद्‌गार प्रातिनिधिक स्वरूपाचे वाटतात ते म्हणतात, ''इतिहास कायदा आणि तर्क यांच्या कसोट्यांवर आपली धर्मकल्पना तर त्यांनी तपासलीच पण धर्मसुधारणेच्या प्रयत्नांना अधिकाधिक परिणामकारक करण्याच्या उपायांचाही सतत वेध घेतला.''[७]

**जुन्या संतपरंपेरेचे पुनरुज्जीवन**

संतपरंपरा आधुनिकतेला जवळची आहे. आधुनिक काळात समाजसुधारकांनी जे विचार सांर्गिाले. ते संतांनी अगोदरच सांगून ठेवले होते. त्यामुळे आपल्या आधुनिक

विचारवंतांना संतांच्या विचार दृष्टीचा आधार मिळाला. अव्वल इंग्रजी कालखंडात जसे अनेक समाजसुधारक निर्माण झाले तसे आधुनिक संतही जन्मास आले. या दोहोंच्या विचारधारेमध्ये फारसा फरक नाही.

पेशवाईचा अस्त होऊन इंग्रजी राजवट जरी सुरू झाली तरी महाराष्ट्रातील संतपरंपरा नामशेष झाली नाही. या संदर्भात ज. वा. जोशी म्हणतात, ''आत्माविष्कार, समाजप्रबोधन, भक्तिमार्ग आणि मोक्षसाधना यांचे अनुसंधान संतांनी त्यांच्या साहित्याचे प्रयोजन मानले होते.''[८]

बदलणाऱ्या काळाचे भान ठेऊन परिस्थितीनुरूप नवनवे विचार आत्मसात करीत स्वत:च्या सांस्कृतिक संचिताचे भरणपोषण करणे, संवर्धन करणे हे आपले नैतिक कर्तव्य आहे. हे ओळखून समाजातील सुधारक साहित्यिक, कलावंत, शास्त्रज्ञ आणि धर्मप्रवर्तक साक्षात्कारी संत कार्यरत असतात. म्हणूनच मध्ययुगीन आणि अर्वाचीन संतमंडळींनी ईश्वरनिष्ठांची मांदियाळी निर्माण करून पारमार्थिक क्षेत्राबरोबरच समाजजीवनात देखील समता, स्वातंत्र्य, बंधुता या मूल्यांचा विकास केला.

सर्वस्पर्शी समाजदृष्टी मुळातच लाभलेल्या अर्वाचीन संतमंडळींनी काळाचे आव्हान ओळखून धर्मकारण आणि राजकारण यात सुधारणा घडवून आणण्यासाठी प्रत्यक्ष समाजजीवनात सक्रिय सहभाग घेतला. म्हणूनच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, विनोबा भावे, स्वामी स्वरूपानंद यासारख्या संतमंडळींनी स्वातंत्र्यसंग्रामात भाग घेतला, प्रसंगी तुरुंगवास पत्करला. पण आपले मानवता धर्मावरील अधिष्ठान कार्य जोमाने सुरू ठेवले. म्हणूनच आधुनिक समाजजीवनात 'अणू' सारखे कितीही शोध लागले, जीवन गतिमान झाले तरी या आधुनिक शोधामुळे होणारे संभाव्य धोके टाळावयाचे असतील तर व संशोधनाचा मानवाच्या कल्याणासाठीच उपयोग झाला पाहिजे. या विचारधारेचा त्यांनी सदैव पुरस्कार केला, म्हणूनच डॉ. ब. ना. तुरंबेकर म्हणतात त्याप्रमाणे, ''संतांची भूमिका प्रतिगामी व मागासलेली नाही.

जुने–नवे, पारंपरिकता आणि आधुनिकता विज्ञान आणि अध्यात्म यांच्यात समन्वय साधून या संबंधीचा विवेक त्यांनी समाजासमोर मांडला.''[९]

आपल्याला अशा या अर्वाचीन संतपरंपरेचा पुढील प्रमाणे थोडक्यात परिचय करून घेता येईल.

**१) गोदामाउली कीर्तने (इ. स. १८३३–१९१०)**

करवीर संस्थानातील आध्यात्मिक अनुभूतीदृष्ट्या उच्चस्तरावर पोहोचलेल्या गोदामाउली कीर्तने यांचा जन्म १८३३ साली श्री. नारायणराव कीर्तने व सौ. लक्ष्मीबाई कीर्तने यांच्या पोटी झाला. बालपणापासूनच विठ्ठल–रखुमाईच्या भक्तीत रममाण असणाऱ्या गोदामाउलींचा विवाह वयाच्या पाचव्या वर्षी झाला. पण अल्पावधितच त्यांना वैधव्य आले. माहेरी आल्यावर 'मथुरा स्वामींनी' त्यांच्यावर कृपा केली. जप–जाप्य, अखंड नामस्मरण यात त्यांचा वेळ जाऊ लागला. याच दरम्यान रामचंद्र बुवा तिकोटेकर या महान सत्पुरुषाचा त्यांना आध्यात्मिक सहवास लाभला. त्यांनी सद्‌गुरूपद स्वीकारून गोदामाउलींना दीक्षा दिली. आध्यात्मिक अनुभूतीचा अमृतमयी प्रकाशात न्हाऊन निघालेल्या गोदामाउलींना सद्‌गुरूंनी उपदेश केला की, ''जो मार्ग तुला दिला तो इतरांनाही सांग, त्याच मार्गाने साधकांना स्वगृही आणणे हे काम तुला आता करायला हवे.'' या दृष्टीने गोदामाउलींनी स्वात्मबोध, स्वानुभूती इ. ग्रंथांची रचना करून संसारतापाने पोळलेल्या अनेक जीवांना शांती मिळवून दिली, तर त्यांचे अनेक शिष्य सद्‌गुरूपदी पोहोचलेले दिसून येतात.

**'आता तरी लागे सज्जनाचे पायीं। लावितील सोय तारक तें ।।धृ।।'**

यासारख्या त्यांच्या अभंग रचना संतसज्जनांच्या सहवासाचे सामर्थ्य प्रकट करतात. त्यामुळेच ज. वा. जोशी म्हणतात की, ''त्यांच्या काव्यातून त्यांच्या आध्यात्मिक अधिकाराची सहज कल्पना येऊ शकते. त्यांचे काव्य सहज स्फूर्ती व विविधांगी स्वरूपाचे आहे. शिवाय आध्यात्मिक अनुभूतींनी भरलेले आहे.''[१०]

## २) श्रीगुलाबराव महाराज (इ. स. १८८१–१९१५)

६ जुलै, १८८१ रोजी श्री गोदुजी व आई अलोकाबाई या सत्व्रती मातापित्यांच्या पोटी श्रीगुलाबराव महाराजांचा जन्म झाला. पुढे दुर्दैवाने महाराजांना अंधत्व आले. यातच वयाच्या ४ थ्या वर्षीच त्यांच्या आईचे निधन झाले. आठव्या वर्षांपर्यंत त्यांच्या आजीने त्यांचे पालनपोषण केले. पुढे वडिलांनी त्यांना 'माधनला' या गावी नेले. तिथे सावत्र आईने त्यांचा सांभाळ केला. अंधत्वामुळे त्यांना शालेय शिक्षण घेता आले नाही. पण अंत:करणातील दिव्य दृष्टीमुळे फक्त श्रवणाने त्यांनी विविध श्लोक, शिवलीलामृत, व्यंकटेश स्त्रोत इ. पाठांतर केले. पुढे तर वेदावेदांतापासून संगीत, वैद्यक – साहित्यशास्त्र थिऑसॉफि, पाश्चमात्य तत्त्वज्ञान इथपासून ते आधुनिक शास्त्रातील इलेक्ट्रॉन थेअरीपर्यंत त्यांनी आपला ग्रंथवाचनाचा व्यासंग वाढविला होता.पुढे १८–१९ व्या वर्षी त्यांना ज्ञानेश्वर माऊलींचा साक्षात अनुग्रह लाभला व त्यांनी स्वत:ला 'ज्ञानेश्वर कन्या' म्हणून संबोधायला सुरुवात केली. याचबरोबर आपल्याला 'श्रीकृष्ण पत्नित्वाचा' अधिकार मिळावा यासाठी त्यांनी 'कात्यायनी' महाव्रताचा आरंभ केला व ते मधुराभक्तीमध्ये रममाण होऊन गेले. आपली पत्नी 'मनकर्णिकाबाई' यांनी १९०७ मध्ये इहलोक सोडल्यावर 'पत्नी प्रेमपराग' नावाचे भावकाव्य त्यांनी रचले ते रसिकहृदय हेलावून सोडणारे आहे.

पुढे महाराजांनी भक्तीला शास्त्रीय बैठक प्राप्त करून दिली. संगीत, वैद्यक, व्याकरण, साहित्य शास्त्र यांसारख्या १३० ग्रंथांचे लेखन केले. त्यांचा अफाट ग्रंथसंग्रह बघून साहित्य सम्राट न. चि. केळकर यांनी 'महाराजांचे ग्रंथ म्हणजे एक मोठा ज्ञानकोश झाला आहे.' असे उद्‌गार काढले. यामधून महाराजांच्या वाङ्मयाची श्रेष्ठता सिद्ध होते, असे म्हणावे लागेल. अशा या ज्ञानोपासक, ज्ञानेश्वर कन्येने, १८३७ भाद्रपद द्वादशी (२० सप्टेंबर १९१५) रोज सूर्योदयसमयी समाधी घेतली.

### ३) श्रीप्रज्ञानंद सरस्वती (१८९३)

श्री प्रज्ञानंद सरस्वती यांचे पूर्वीचे नाव श्री. दत्तात्रय नारायण कर्वे असे होते. त्यांचा जन्म १५ मे, १९६३ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील, दापोली तालुक्यातील गिजवणे या गावी झाला. घरातूनच त्यांना संगीत आणि कीर्तनभक्तीचे संस्कार मिळाले होते. पुढे शिक्षकीपेशा स्वीकारून गृहस्थाश्रमी जीवन जगताना त्यांनी आपल्या आध्यात्मिक वृत्तीत खंड पडू दिला नाही. म्हणूनच त्यांनी १९४३ मध्ये खेड येथील 'वासुदेवानंद सरस्वती' यांचेकडून चतुर्थाश्रम संन्यास दीक्षा स्वीकारली. श्रीराम महिमा गात त्यांनी संपूर्ण भारतभर कीर्तन करीत भ्रमंती केली. १९५९ पासून ते निर्वाणापर्यंत मराठवाड्यातील परांडा येथे राहिले.

**संताचे चरणी नम्र व्हावे भावें । तरीच पावावें नामरत्न ।।१।।**

**रज गुरूपद, लागता मस्तका । यमा सहस्तका येववेना ।।२।।**

**रामनामी जे रंगे। जन्ममृत्यू तैं भंगले ।।३।।** [११]

यासारख्या पदांतून त्यांनी संतभक्ती, सदगुरू भक्ती, रामनाम भक्तीचे सामर्थ्य वर्णन केलेले आहे. परमेश्वर प्राप्तीसाठी शास्त्रांचा आधार, वेदांच्या अभ्यासाची गरज नाही तर रामनामाचा आधार पुरेसा ठरतो. रामदास स्वामींच्या वाङ्मयाचा प्रभाव प्रज्ञावंतांच्या रचनांवर दिसून येतो. त्यामुळेच दैनंदिन जीवन व परमार्थ यांची सांगड कशी घालावी हे सांगणाऱ्या त्यांच्या काही रचनांवर 'मनाच्या श्लोका'ची छाप दिसते. 'रिपु देशावरी करी आक्रमण। तयांचे पूजन युद्ध करा ।।' असा त्यांचा रोखठोकपणा त्यांच्या रामदासपणाची साक्ष देतो.

पुढे महाराजांनी श्रीगुरुगीता, श्रीरामचरितमानस आणि हनुमानचालिसा आदी ग्रंथांचे समवृत्त मराठीत रूपांतर केले. त्याचबरोबर मनाच्या श्लोकांचे हिंदीमध्ये रूपांतर केले. तसेच अभंगरामायण या ग्रंथाची रचना करून या वाङ्मयनिर्मितीद्वारे आपल्यातील आध्यात्मिक प्रतिभेचे दर्शन घडविले.

## ४) श्रीविष्णुदास महाराज (इ. स. १८६४–१९२४)

श्रीविष्णुदासांचा जन्म सातारा येथील धांदरफळे कुटुंबात १८६४ साली झाला. लहानपणापासून भाविकवृत्तीच्या विष्णुदासांच्या मनात विरक्तीची भावना वाढत गेली. त्यामुळेच विवाहानंतर त्यांनी दत्तभेटीच्या तळमळीने घर सोडले. पंढरपूर, तुळजापूर, अक्कलकोट, हंपी, श्रीशैल इ. क्षेत्रांच्या यात्रा करीत ते माहूर क्षेत्री स्थिर झाले व तिथेच त्यांना श्री दत्तात्रय व जगन्माता रेणुका यांचे दर्शन झाले. पुढे त्यांचे कुटुंबीय त्यांचा शोध घेत माहूर क्षेत्री आले व त्यांच्या संसारास पुन्हा सुरुवात झाली. सुमारे १४ वर्षे संसार केल्यावर त्यांची पत्नी तिथेच निवर्तली. त्यानंतर नित्यानंद सरस्वतींकडून संन्यास दीक्षा घेऊन 'पुरुषोत्तमानंद सरस्वती' असे नाव त्यांनी धारण केले व माहूर क्षेत्री १९२४ रोजी त्यांनी जीवनयात्रा संपविली.

सरस्वतींचा अनुग्रह झालेल्या श्रीविष्णुदास महाराजांनी देवदेवतांविषयक अनेक पदे, अभंग, आरत्या, अष्टके, पाळणे, लावण्या, पोवाडे रचले. त्याचबरोबर आख्यान काव्ये व नाटकेही त्यांनी लिहिली. त्याचबरोबर दत्तप्रभु, जगदंबा, रेणुका माता यांची अत्यंत तळमळीने काव्यपूजा त्यांनी केलेली दिसते. त्याचबरोबर

**'तुझा म्हणवितो अंकित। बसतो अफु, गांजा, फुंकत।।**

**तुझा म्हणवितो आश्रित। नाही आत्मज्ञान श्रुत।।'**

यासारख्या रचनांमधून संतत्वाच्या नावाखाली चालणाऱ्या ढोंगीपणावर त्यांनी हल्ला केला आहे.

**'राज्य कठिण हे आलें कलींचे वर्तमान भलें नव्हे नव्हें'**

**प्रजा–वृत्ती–धन हरण कराया निघती कायदे नवे नवे घरोघरी**

**अंधार परंतु रस्तो रस्ती दिवे दिवे ।।१६।।**[१२]

या सारख्या रचनांमधून वर्तमान युगातील विरोधाभास त्यांनी स्पष्ट केलेला दिसतो. थोडक्यात, परमेश्वर भेटीची आंतरिक ओढ, तळमळ तर त्यांच्या काव्यातून दिसतेच पण त्याचबरोबर वास्तव जगातील भोंदूपणा, विसंगतपणा यांचेही दर्शन होते.

## ५) श्रीकोटणीस महाराज (इ. स. १८६४–१९२४)

सांगलीस्थित कोटणीस महाराजांचा जन्म दि. ७/११/१८६४ रोजी 'तेरदाळ' या त्यांच्या आजोळी झाला. बालपणापासूनच ईश्वरभक्तीची ओढ असणाऱ्या कोटणीस महाराजांनी वकिलीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले असले, तरी इ. स. १८६६ मध्ये चिमडच्या महाराजांचा त्यांना अनुग्रह लाभला. आपल्या वकिली व्यवसायाचे व्याप सांभाळत, आपला धर्मशील दिनक्रम त्यांनी चालू ठेवला.

श्रीकोटणीस महाराजांनी सांगली येथे आपल्या आत्मानुभव संपन्न वाणीने कीर्तनभक्तीची थोर परंपरा सदैव जागृत ठेवली. विविध ठिकाणच्या त्यांच्या कीर्तन सोहळ्यास हजारोश्रोते, अधिकारी पुरुष उपस्थित असत. कीर्तनाख्यानास पूरक अशा उत्तमोत्तम वेच्यांचा बहुमोल असा 'कैवल्य वैभव' संदर्भ ग्रंथ त्यांनी तयार केला होता.

ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम इ. संतांच्या अभंगाच्या वचनाने व श्रवणाने अनेक दु:खे नष्ट होतील असा त्यांचा आत्मविश्वास होता. म्हणून संत साहित्याचा महिमा गाताना ते म्हणत,

**'ज्ञानेश्वरी गोवा पियुषाची खाणी । भवरोग हरूनी अमर करी ।।१।।**
**एकेक अक्षरे महादेव जाती । होती परिचिती भाविक ते ।।४।।'** [१३]

परमेश्वर प्राप्तीसाठी चारधाम यात्रा, व्रतवैकल्ये, कोरडी वैराग्यवृत्ती, उद्यपणे इ. कर्मकांड करणाऱ्या वृत्तीचा त्यांनी निषेध करून शुद्ध अंत:करणाने संसारव्याप सांभाळीत नामस्मरण केले तर परमेश्वर प्राप्ती होते, असा विचार त्यांनी आपल्या रचनांमधून मांडला आहे. श्रीसंत तात्यासाहेब कोटणीस महाराज यांचे जीवन आणि कार्य म्हणजे 'प्रपंच, परमार्थ समन्वयाचे, आत्मानुभवी भक्तीचे, सद्गुरू निष्ठेचे आणि धर्मजागृती करणाऱ्या लोकसंग्रही भूमिकेचे श्रेष्ठ प्रतीक आहे.' असे डॉ. जगन्नाथ जोशी यांनी काढलेले उद्गार सार्थ वाटतात.

### ६) श्रीअवधूत महाराज (इ. स. १८७३–१९३९)

श्रीमोरेश्वर केशव दातार ऊर्फ संत अवधूत महाराज यांचा जन्म भाद्रपद कृष्ण चतुर्थी सन १८७३ कुरुंदवाड (जि. कोल्हापूर) येथे झाला. त्यांना बालपणापासून श्रीदत्त भक्तीची आवड होती. उच्च शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी काही काळ वकिलीचा व्यवसाय केला. नाट्यकलेच्या आवडीमुळेच भजन, कीर्तन, निरूपण यामध्ये त्यांची चांगली प्रगती होती. इ. स. १९०५ मध्ये श्रीगुरू द्वादशीचे दिवशी श्रीसंत पंत महाराज बाळेकुंद्री यांचा त्यांना अनुग्रह लाभला. इ. स. १९३९ च्या प्रतिपदेस ते श्रीदत्त स्वरूपात विलीन झाले.

कीर्तनामुळे त्यांनी संपूर्ण महाराष्ट्र व भारतभर भ्रमंती केली. याच कीर्तन यात्रा प्रवासात त्यांना श्री साईबाबा, शेगावचे श्रीगजानन महाराज, नाथपंथ तपस्वी श्रीशीलानाथ महाराज यांसारख्या तत्कालीन संतपुरुषांचे दर्शनभाग्य लाभले व त्यांचे पारमार्थिक जीवन अधिकच संपन्न झाले. पुढे कीर्तन यात्रेमुळे खानदेशातील भडगांव येथे त्यांचे वारंवार येणे झाले आणि तीच त्यांची उत्तर आयुष्यातील कर्मभूमी बनली.

संतभक्ती, दत्तभक्ती, नाथपंथ, योगमार्ग, अवधूत मार्ग, वेदान्त तत्त्वज्ञान आदी विषयांवर त्यांच्या मूलस्वरूपावर आपल्या कीर्तनामधून त्यांनी भर दिला.

संताच्याजवळ ज्ञानाचा उगम असतो. त्यांना नमन केल्याने, त्यांच्या मार्गदर्शक विचारांचा स्वीकार केल्यामुळे रज, तम, विकार नष्ट होतात व अनंत योनींची पापे नष्ट होतात असा विश्वास ते व्यक्त करतांना म्हणतात की,

**याच देही आहे त्रिवेणी संगम । ज्ञानाचा उगम संतजागे ।।१।।**

**संतांशी नमन भक्तिभावे करा । रजतम सारा घालवी जो ।।२।।**

**घालवील पाप अनंत योनीचे । गुण गाऊ त्यांचे आवडीने ।।३ ।।** [१४]

अवधूत महाराजांनी ‘आत्मबोध’, ‘मनाचे श्लोक’, ‘अवधूत हरिपाठ’, ‘बावन्न मंत्राची लावणी’, काही अभंग, पदे अशी स्फूट रचना केलेली आहे. या सर्व रचनांच्यामधून

ईश्वर, श्रद्धा, गुरुनिष्ठा, संसार, परमार्थरूपाने करण्याची शिकवण अद्वैत जीवनदृष्टी या गोष्टी आपल्याला दिसून येतात.

### ७) श्रीदासगणू महाराज (इ. स. १८६७–१९६२)

नगर जिल्ह्यामध्ये इ. स. १८६७ मध्ये जन्म झालेल्या श्रीदासगणू महाराजांना 'आधुनिक महिपती' म्हणून गौरविले जाते. त्यांची कीर्तनाख्याने, संतचरित्रकथा सर्वांच्या आदरास पात्र ठरली आहेत.

त्यांचे जन्मनाव नारायण होते. पण त्यांचे कान व पोट यांची ठेवण पाहून 'गणेश' ऊर्फ 'गणू' असे सर्वजण म्हणू लागले. ईश्वर भक्तीचा वारसा त्यांना आपले पणजोबा 'श्री अप्पाजी सहस्त्रबुद्धे' यांचे कडून लाभला होता.

जेमतेम शिक्षण झालेल्या श्रीदासगणू महाराजांना शीघ्रकवित्वाचे वरदान असल्यामुळे आपला काही काळ त्यांनी 'तमाशा' या लोककलेतील पोवाडे, लावण्या या रचनांमध्ये घालविला. १९९१ मध्ये त्यांचा विवाह झाला. सुमारे अकरा वर्षे त्यांनी पोलीस खात्यात नोकरी केली. याच दरम्यान 'श्रीवामनराव शास्त्री इस्लामपूरकर' या सत्पुरुषाशी त्यांचा घनिष्ठ संबंध आला. त्यांच्यापासूनच महाराजांनी मंत्रोपदेश घेतला. श्रीसद्‌गुरूंचा दासगणू म्हणून दासगणू अशी नाममुद्रा त्यांनी आपल्या सर्व काव्यरचनेत स्वीकारली. आपल्या गुरूंच्या आज्ञेनुसार त्यांनी पंढरपूर वारी सुरू केली. श्री महाराजांना अनेक समकालीन महापुरुषांचे सहवास लाभले. त्यामध्ये प. पू. श्रीवासुदेवानंद सरस्वती (टेंबेस्वामी महाराज) श्रीसद्‌गुरू साईबाबा यांचा समावेश होतो. या सहवासामुळेच त्यांच्या आध्यात्मप्रवण प्रवासाला सुरुवात झाली व संतचरित्र गायनाला त्यांनी प्रारंभ केला. म्हणूनच 'संत चरित्रांचे गायन करून संतांचा जीवनादर्श समाजातील सर्व स्तरापर्यंत पोहोचविणारा एक अर्वाचीन संत म्हणून त्यांचा उल्लेख करावयास हरकत नाही'.

परमेश्वर, संत आणि देवता यांच्या बाबतीत भेद ठेवू नये अशी शिकवण त्यांनी दिली म्हणूनच सगुण, निर्गुण, निराकार, निर्विकार अशी मतमतांतरे न मांडता वादविवाद न मांडता

वादविवाद न घालता सरळ पांडुरंगाला शरण जावे, त्याच्याच चरणी सर्वभ्रांत मिटेल असे त्यांचे सांगणे होते म्हणूनच ते म्हणतात की...

**'सगुण निर्गुण। निर्गुण सर्व काही। अससि तूं एक विठाबाई**

**तुझे दर्शन। दर्शन जया होई। तया मग वाद उरत नाही...'**[१५]

समाजाने आपला उपलब्ध वेळ सत्कार्यात व्यतित करावा, कुणाचे वाईट चिंतू नये, स्त्रियांचा सन्मान करावा, अंधश्रद्धेला बळी पडू नये, कर्ज काढून सण साजरे करू नयेत. दांभिक भक्ती करू नये, शाब्दिक ज्ञानापेक्षा अनुभवाला महत्त्व द्यावे, उगाच वादविवाद घालू नये अशी अनेक समाज उपकारक मार्गदर्शक तत्त्वे त्यांनी आपल्या ग्रंथरचनेतून समाजाला दिलेली दिसतात.

### ८) श्री बाबाजी महाराज पंडित (इ. स. १८८६-१९६४)

महाराजांचे पूर्वाश्रमीचे नाव नारायण पैकाजी पंडित असे होते. त्यांचा जन्म १२ जानेवारी, १८८६ रोजी चांदूर येथे झाला. बी. ए. पर्यंतचे शिक्षण पूर्ण झाल्यावर दैवयोगाने त्यांचा श्रीगुलाबराव महाराज या संत विभूतीशी संबंध आला व त्यांचे भाग्य उजळून निघाले. श्रीगुलाबराव महाराजांनी आपला संप्रदाय पुढे चालू ठेवण्यासाठी सांगून त्यांना 'तू वाच, तुला समजेल' असा शुभाशीर्वाद दिला. कीर्तन, प्रवचन, ग्रंथलेखन, संवर्धन या माध्यमातून त्यांनी श्रीगुलाबराव महाराजांचे 'मधुरा सांप्रदायाचे' कार्य निष्ठेने चालू ठेवले. त्यासाठी अमरावतीला ग्रंथालय बांधले. संस्थानासाठी जमीन घेऊन, कायमच्या उत्पन्नाची सोय केली. गुलाबराव महाराजांचे अप्रकाशित वाङ्मय उजेडात आणले. त्याचबरोबर धर्माचे स्वरूप सांगणारा, 'आर्यधर्मोपत्ती' या ग्रंथाबरोबरच हरिपाठ रहस्य, अमृतानुभव कौमुदी, ज्ञानेश्वरी गूढार्थ दीपिका या ग्रंथाच्या लेखनाबरोबर 'अभंग गाथे'चे लेखन त्यांनी केले. संत चरणांच्या सेवेतच आपला उद्धार होईल हे सांगताना ते म्हणतात...

**'संताचे उच्छिष्ट लाभले जयासी। वंदिती तयासी ब्रह्मादिके ।।१।।**

**संतचरणरज प्रेम होती शिरीं। त्याचे घरी हरी पाणी वाहे ।।२।।**

**संताचा पोसणा तिहीं लोकी वंद्य। कुळ्याती निंद्य पावन ते ।।३ ।।**

**म्हणोनिया संत पायीचा पायिक। फिके ब्रह्मसुख तयांपुढे ।।४ ।।**

**कंददास म्हणे तुम्ही कृपा करा। मग सुखें घरा येईल हरी ।। ५ ।।'** [१६]

श्रीगुलाबराव महाराजांचे 'मधुरा' संप्रदायाचे कार्य प्रामाणिकपणे पूर्णत्वास नेणाऱ्या श्री बाबा महाराजांचे १ फेब्रुवारी १९६४ रोजी महानिर्वाण झाले.

## ९) श्री संत तुकडोजी महाराज (इ. स. १९०८ – १९६८)

श्री संत तुकडोजी महाराज यांचा जन्म अमरावती जिल्ह्यातील यावली येथे इ. स. ३० एप्रिल, १९०८ रोजी झाला. लहानपणीच त्यांना ईश्वरभक्त,आईवडील आणि सत्पुरुष श्री अडकोजी महाराज यांचा सहवास आणि संस्कार लाभले. महाराजांनीच त्यांचे नाव 'तुकड्या' असे ठेवले. त्यांचाच अनुग्रह तुकडोजींना लाभला. १९२१ मध्ये सद्गुरु श्री अडकोजी समाधिस्थ झाल्यानंतर श्री महाराजांनी फकिरी व्रत स्वीकारले. बरीच भ्रमंती करून तपश्चर्या केली.

श्री तुकडोजी महाराजांची भजने, प्रवचने खूप लोकप्रिय झाली. महात्मा गांधींनादेखील त्यांच्या भजनांनी प्रभावित केलेले होते. आपल्या भजन कीर्तनातून धर्म, नीती, राष्ट्रधर्म यांच्या जागृतीसाठी प्रयत्न केले. त्यामुळेच ऑगस्ट १९४२ च्या स्वातंत्र्य संग्रामात त्यांना कारागृहवासही घडला.

१९३५-४७ या कालखंडात 'मोझरी' येथे 'श्री गुरुदेव सेवाश्रमाचा' विकास करीत त्यांनी साक्षरता प्रसार, गोरक्षण, पशुहत्या बंदी, व्यसनमुक्ती, अस्पृश्यता निवारण, ग्रामसफाई इ. अनेक समाज विधायक उपक्रमांना सुरुवात केली.

प्रार्थना, भजने, पदे, अभंग यामधून आणि 'ग्रामगीता' या आपल्या प्रख्यात ग्रंथामधून त्यांनी व्यक्तिधर्म, कुटुंबधर्म, ग्रामधर्म, समाजधर्म, राष्ट्रधर्म आणि विश्वधर्म यांचे विचार मांडून प्रबोधन केले.

संत सज्जनांच्या सहवासाने मनातील वाईट भावना गळून जातात. समाजात प्रेमाची भावना वाढीस लागते. 'विश्वाचे घर' ही वृत्ती बळावते. त्यामुळेच सदैव संतांना शरण गेले पाहिजे असे सांगताना ते म्हणतात,

**'विश्वची घर भासुनी, जीव हा होत सदा दंग।**

**प्रगटतो भक्तीचा रंग। असा हा संतांचा संग।।धृ.।।**

सद्‌गुरू कृपेने प्रकाशमान झालेल्या मनाला परमेश्वर हा मंदिरात नसून तो दीनदुबळ्यांच्या सेवेत रत असतो याची जाणीव होते. त्यामुळेच परमेश्वरप्राप्तीसाठी मंदिर, तीर्थयात्रा यापेक्षा तो गरिबांच्या झोपडीत आढळेल, म्हणजेच पददलितांच्या, कष्टकऱ्यांच्या श्रमिकांच्या सेवेतच त्याची प्राप्ती होईल, हा विश्वास व्यक्त करताना ते म्हणतात,

**'देव स्फूर्तिरूपी बोलला। ऐकोनि आनंद झाला।**

**जिव कळवळोनि हा आला, लागली ज्योत गगनाला।।२।।**

**'मी होतो पूर्वी मंदिरी, आता राहतो श्रमिका दारी।**

**खाऊनी शिळ्या भाकरी, राहतो शेतात अति मौजेत।।३।।**

**माझा कधीचा पत्ता बदलला, लोक वेडे जाति तीर्थाला।**

**हा निरोप द्या सकलाला, करा सेवा मिळुनि खंडात'।।४।।**

**तुकड्याने ऐकोनि ध्वनी, केला आवाज हा गर्जोनि।**

**गरिबाची हाक घ्या कानी, तरि देव नेईल मोक्षात।।५।।** [१७]

अशा प्रकारे लोकशिक्षण, संस्कृती शिक्षण याचा आपल्या कार्यामधून सदैव पुरस्कार करणारे श्री तुकडोजी महाराज ११ ऑक्टोबर, १९६८ रोजी गुरुकुंज येथे ब्रह्मलीन झाले.

### १०) कलावतीदेवी (इ. स. १९०८–१९७८)

कारवार येथील कल्याणपूर गावात कलावती देवीचा जन्म २ सप्टेंबर, १९०८ रोजी कल्याणकर कुटुंबात झाला. बालवयापासूनच त्यांना पूजा, प्रार्थना, ध्यान यांची आवड होती. यामुळेच मनाचे श्लोक, शिवमानसपूजा, आत्माष्टक या साहित्याचे त्यांच्यावर संस्कार झाले.

वयाच्या १५ व्या वर्षी एच. राजगोपाल यांच्याशी त्यांचा विवाह झाला. पुढे सिद्धारूढ स्वामींचे दर्शन त्यांना झाले, आणि ॐ नम: शिवाय हा मंत्रप्रसाद त्यांनी कलावती देवींना दिला. १९२७ मध्ये त्यांच्या पतीचे अकाली निधन झाले. नंतरचे आयुष्य त्यांनी सिद्धारूढ स्वामींच्या सान्निध्यात श्री सद्गुरु सेवेत घालवत आध्यात्मिक विकास करवून घेतला.

पुढे अन्नदान, रुग्णसेवा, कीर्तनसेवा याद्वारे धर्मप्रबोधनाबरोबरच त्यांनी समाज प्रबोधन केले. 'श्रीहरि मंदिर' स्वरूपात अनेक ठिकाणी भक्तीची व्यासपीठे निर्माण करून सर्वसामान्यांना त्यांनी मार्गदर्शन केले. 'ॐ नम: शिवाय' या प्रसाद मंत्राचे सामर्थ्य, श्री सद्गुरू सेवेचे महत्त्व त्यांनी आपल्या रचनांमधून सांगितले.

'मध्ययुगीन काळात मुक्ताबाई, बहिणाबाई, जनाबाई आदी स्त्री संतांनी संत धर्माचे श्रेष्ठ आदर्श निर्माण केले. अर्वाचीन काळात श्री कलावतीदेवी यांचे महन्मंगल जीवन, प्रभावी कार्य हे त्याच थोर आदर्शाचे दिव्य प्रतीक आहे'.

**११. संतगाडगेबाबा : (१८७६– १९५६)**

अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर तालुक्यातील शेणगाव या ग्रामी  गाडगे महाराजांचा जन्म झाला. महाराजांचे पूर्वाश्रमाची नाव 'डेबू' असे होते. आईचे नाव सखुबाई व वडिलांचे नाव झिंगराजी असे होते. ज्या परीट समाजात महाराज जन्माला आले होते. तो समाज तत्कालिन सामाजिक कर्मकांड, अंधश्रद्धा यांच्या गर्तेत सापडला होता. म्हणूनच या समाजामध्ये विविध समारंभात बकरे, कोंबड्याचे बळी देणे, मद्यप्राशन करणे या गोष्टींचा सहजपणे स्वीकार केला जात असे. रूढीपरंपरेच्या नावाखाली सुरू असणाऱ्या या चुकीच्या गोष्टी व त्याचे होणारे वाईट परिणाम डेबुजी लहानपणापासून बघत आलेले होते. त्याचा डेबुजीच्या परिणाम मनावर झाला. अशा चुकीच्या कर्मकांडाला विरोध करून समाजाला सन्मार्गाला लावले पाहिज, या विचारा मुळेच त्यांनी फकिरी बाणा पत्करून समाजप्रबोधनाचे काम विविध अंगानी सुरू ठेवले.

आपल्या कीर्तनाद्वारे त्यांनी ग्रामस्वच्छतेच्या पुरस्कार केला, समाजाचे प्रबोधन केले. मुंबई, पंढरपूर अशा अनेक ठिकाणी त्यांनी धर्मशाळा बांधल्या. शिक्षणाचे महत्त्व ओळखून शाळांची उभारणी केली. गरिब विद्यार्थ्यांना मोफत रहाण्याची व भोजनाची सुविधा मिळावी म्हणून वसतिगृहाची उभारणी केली.

आपल्या कीर्तनातून त्यांनी व्यसनाधिनता, अस्वच्छता, पशुबळी, मानसिक गुलामगिरी, अंधश्रद्धा यांना कडाडून विरोध केला. श्रमाचे महत्त्व, शिक्षणाचे महत्त्व, खरा धर्म यांचे खरे स्वरूप पटवून दिले.

अशा समाजसुधारणावादी संताने इ. स. १९५६ रोजी अमरावती येथे आपला देह ठेवला.

**श्री संत मारुती महाराज माकनेरकर :**

विदर्भ भूमीला अनेक धार्मिक ग्रंथात संपन्न आध्यात्म भूमी म्हणून संबोधलेले आपणास दिसून येते. या भूमीने अर्वाचीन काळात महाराष्ट्राला पर्यायाने भारत देशाला समाजसेवक/संत दिलेले आहेत. त्यापैकी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, लोकसेवक गाडगेबाबा व सुधारणावादी संत श्रीमारुती महाराज माकनेरकर ही संतत्रयी महत्त्वाची आहे.

बुलढाणा जिल्ह्यात मलकापूर हा तालुका आहे. या तालुक्यात अत्यंत अल्प लोकवस्तीचे माकनेर हे गाव वसले आहे. या छोट्या खेड्यात इ. स. २३ ऑक्टोबर, १८६६ रोजी संत मारुती महाराजांचा जन्म झाला. इ. स. १८६६ ते १९४८ असा महाराजांचा आयुमर्यादा काळ आहे. त्यांना (८२ वर्षांचे दीर्घायुष्य लाभले.)

ज्ञानेश्वर माउलींनी ज्ञान लक्षणे सांगतांना अमानित्व, अहिंसा, आर्जव, शुचित्व, अंत:करणनिग्रह, वैराग्य, समचित्त इ. गुणांचा उल्लेख केला आहे, तर अभय, सत्य, दया या गुणांचा दैवी संपत्ती म्हणून उल्लेख केलेला आहे. श्री संत मारुती महाराजांच्या ठिकाणी वरील ज्ञान लक्षणांचा आणि दैवी संपत्तीच्या गुणांचा सुंदर मिलाफ होता. त्या गुणांच्या द्वारेच समाज प्रबोधनाचे महत्त्वाचे कार्य त्यांनी हाती घेतले व यशस्वी केलेले आपणास दिसून येते.

विशिष्ट कालखंडातील संत साहित्याचा अभ्यास करताना बहुतेक वेळेला संबंधित संतांच्या वाङ्मय कृतींच्या मूळप्रती मिळत नाहीत. पाठांतराद्वारे हे वाङ्मय समाजामार्फत एका पिढीकडून पुढच्या पिढीकडे हस्तांतरित केले जाते. त्यामुळे त्यात बहुतेक वेळेला पाठभेद होण्याचा धोका असतो. या संदर्भात 'श्री संत चोखामेळा : चरित्र व अभंग' या ग्रंथात स. भा. कदम यांनी मांडलेले विचार महत्त्वाचे वाटतात. 'संत स्वभावत: परमार्थ प्रणव असतात. त्यामुळे स्वत:च्या लौकिक जीवनाविषयी अनास्था असल्यामुळे ह्या विषयी फारसे लिहिताना दिसत नाहीत. समकालीनांनी लिहिलेल्या कथा आणि स्तुतिपर कवने, वचने यातून जी माहिती मिळते ती बहुतांशी अनुमानात्मक असते. संतांचे एकमेकांविषयीचे सहज प्रशंसोद्‌गार आपल्या उपास्य दैवताबरोबर त्यांनी केलेले संभाषण यातून नेमका आध्यात्मिक अनुभव कोणता, भावपर काव्य कोणते आणि ऐतिहासिक सत्य कोणते याची निवड करणे कठीण होते.'[१८] मात्र माकनेरकर महाराजांच्या चरित्राविषयी व साहित्याविषयी या अडचणी उद्‌भवत नाहीत. ही गोष्ट विशेष लक्षात घ्यावयास हवी.

**पूर्व इतिहास व महाराजांचा जन्म**

महाराजांचे भक्त श्रीतोताराम संपत भाकरे, आनंद माधव देशमुख  हे नेहमीच महाराजांच्याबरोबर असत. त्यामुळे महाराजांच्या धार्मिक, सामाजिक, वैचारिक तत्वचिंतक, बुद्धीवादी, सहिष्णु, सात्त्विक इत्यादी अंगभूत जीवनपैलुंना जवळून बघण्याचा त्यांना योग आला. महाराजांच्या या जीवनचरित्राची भावीपिढ्यांना ओळख व्हावी म्हणून त्यांनी लिहून ठेवलेले महाराजांचे ओवीबद्ध चरित्र माकनेरकर संस्थानाने इ. स. २६ सप्टेंबर, १९७८ रोजी प्रकाशित केले. तसेच त्याचाच आधार घेऊन पुढे वामन नरहर देव, ठाणे, व मनोहर त्र्यंबक बाळापूरे यांनी महाराजांचे 'जीवनचरित्र आणि ज्ञानवैशिष्ट' हे छोटेखानी पुस्तक लिहिले आहे. हाच महाराजांच्या चरित्राचा मूळ आधार आहे.

### महाराजांचे पणजोबा जयसिंह ढोले-पाटील

मारुती महाराजांचे पूर्वज हे क्षत्रिय घराण्यातील होते. प्रभु रामचंद्र हे त्यांचे आराध्य दैवत होते. महाराजांच्या पणजोबांचे नाव जयसिंह ढोले असे होते. ते मूळचे उत्तर हिंदुस्थानातील. प्रवास करीत ते वऱ्हाड प्रांतातील खामगाव तालुक्यातील 'सिंदीलासुरे' गावी स्थायिक झाले. तत्कालीन नागपूर राज्याचे राजे आप्पासाहेब भोसले यांच्या सैन्यात जयसिंह सामील झाले. शूरवीर असणाऱ्या जयसिंहांनी आप्पासाहेब भोसलेंची मर्जी संपादन केली.

**'जयसिंह पाटील शूरवीर। सैन्यात गाजवी तरवार।**
**आप्पा राजे तयावर। जीवप्राण करितसे।'**[१९]

पुढे इंग्रजांनी भोसलेंच्या राज्याला वेढा घातला. जयसिंहांच्या मदतीने गुप्त मार्गाने आप्पासाहेब भोसले अरवलीच्या जंगलात वेषांतर करून राहू लागले. पराक्रमी जयसिंह ढोले-पाटलांना ही गोष्ट मानवणारी नव्हती. वैफल्यग्रस्त अवस्थेतच जयसिंह ढोले-पाटलांचा अंत झाला.

### महाराजांचे आजोबा निंबाजी पाटील

जयसिंहांच्या मृत्यूनंतर त्यांचे पुत्र निंबाजी यांच्याकडे परंपरेने सिंदीलासुरे गावची वतनदारी चालून आली.

**'।। दसरा, होळी, पोळा। पूजामान त्याजला।**
**वतनदारी सोहळा। भोगतसे डौलाने ।।'**[२०]

गावातील जवजाळ घराणे व ढोले-पाटील घराणे यांच्यात वाद होऊन निंबाजींना घातपाताने ठार मारण्यात आले. निंबाजींच्या पत्नी बाकाबाई यांनी गाव सोडले व तालसावडी या गावी जाऊन राहिल्या.

### महाराजांच्या आजी बाकाबाई

बाकाबाई कर्तबगार व स्वाभिमानी होत्या. पतीच्या पश्चात गाय, म्हशी आणि थोडीफार शेतजमीन त्यांनी खरेदी केली. आपली मुले रामजी व लक्ष्मणबाबा यांच्यासह शेतजमीन करून स्वाभिमानाने जगू लागल्या.

**।। बाका माता धुरंदर। थाटी अपुले पृथक् घर।**

**नको कुणाचा उपकार। ऐसे मनी योजिले ।।५५ ।।**

**बाई अति स्वाभिमानी। सुलक्षणी, खानदानी।**

**परक्यांच्या औंजळींनी पाणी पिणे रूचेना ।। ५६ ।।**

**पुरणपोळी परक्याची। न माने त्यात रूची।**

**भाजी भाकर कष्टाची। मानी त्यात आनंद ।।७ ।।**

**गाठी दोन सुवर्ण। गाय, म्हैस खरेदून।**

**उत्पादनाचे साधन। बनवी उदरनिर्वाह ।।५८ ।।** [२१]

आपली मुले उपवर होताच, त्यांनी मुलांची लग्ने लावून दिली. लक्ष्मणबाबा आपली पत्नी 'वालंबा' यांच्या सोबतीने आईबरोबर राहिले. रामजी विवाहानंतर सिंदीलासुऱ्याला गेले. तिथेच त्यांचा अकाल मृत्यू झाला. तो आघात बाकाबाईंना सहन झाला नाही. त्यातच त्यांचा मृत्यू झाला.

**महाराजांचे आईवडील**

लक्ष्मणबाबा व वालंबा माता : आई, बंधूंचे निधन झाल्यानंतर लक्ष्मणबाबा व वालंबा माता यांच्यावर संसाराची जबाबदारी आली. त्यांनी अत्यंत सत्त्वशील वृत्तीने संसार पुढे चालू ठेवला.

**'।। दक्ष प्रपंच कर्मात। पतिपत्नी एकमत।**

**युग्म उमा भोलानाथ ।।२२ ।। जना आदर्श जाहले ।।'** [२२]

लक्ष्मणबाबांच्या भोळ्या स्वभावाचा नातेवाईकांनी गैरफायदा घेतला. त्यांना सावकारीपाशात अडकवून जमीन जुमला काढून घेतला. त्यामुळे आपले सर्व कुटुंब घेऊन लक्ष्मणबाबा 'घिर्णी' या गावी राहण्यास गेले. लक्ष्मणबाबांचे आतेभाऊ उदयभान पाटील यांच्याकडे माकनेर या गावची वतनदारी होती. उदयभान यांनी लक्ष्मणबाबांना माकनेर या गावी

कायमचे राहण्यास आणले. अशा प्रकारे लक्ष्मणबाबा, वालंबा माता माकनेर या गावचे रहिवासी झाले,

**।। लासुऱ्याचे ढोले कुळ । भटके पहा रानोमाळ।**

**अंती माकनेर स्थळ । वसतिस्थान मानले ।।**[२३]

**श्रीक्षेत्र माकनेर**

संतवृत्तीच्या लोकांनी पावन झालेले 'माकनेर क्षेत्र' बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर तालुक्यापासून १० कि. मी. अंतरावर आहे. मारुती महाराजांनी आपल्या कीर्तनातून शंकर-पार्वतीच्या संवादाच्या रूपकातून या क्षेत्राचा महिमा सांगितलेला आहे. अनेक साधूसंतांच्या पदस्पर्शाने ही भूमी पवित्र झालेली आहे. भविष्यात देखील इथे नामसंकीर्तनाचे सोहळे साजरे होतील. सर्वत्र या क्षेत्राचा जयजयकार होईल असे भगवान शंकर पार्वतीला सांगतात अशी रूपकाची योजना केलेली आहे

**'अंतरात्मी संत अवतरूनी । पावन करील ही अवनी ।**

**हरीनाम गजराने ।। संतचरण रजकण ।**

**करते देह पावन यास्तव द्यावी लोटांगण । मन पवित्र्य रक्षवया ।**

**ऐसे वदती महेश्वर उमेशी ये गहिवर । तीही करी नमस्कार ।'** [२४]

**महाराजांचा जन्म**

महाराजांच्या मातुश्री 'वालंबा' या मूळच्या जळगाव तालुक्यातील 'एरळी' गावच्या इनामदार घराण्यातील पूर्णाजींच्या कन्या होत्या. इनामदार घराण्यात पूर्वापार चालत आलेल्या विठ्ठल भक्तीचे वारकरी संप्रदायाचे संस्कार 'वालंबा' यांच्यावर झालेले होते. एका अर्थी रामभक्तीत मग्न झालेल्या लक्ष्मणबाबांचे लग्न विठ्ठल भक्तीत रममाण झालेल्या वालंबाशी होणे, हा सुंदर योगायोग म्हणावा लागेल. या उभयतांच्या पोटी जन्माला आलेले 'मारुती महाराज' हा तर वरील योगायोगाचे ईश्वरनिर्मित पूर्व नियोजित फळच म्हणावे लागेल, म्हणूनच महाराजांच्या जन्माआधीच त्यांच्या अलौकिक आध्यात्मिक सामर्थ्याची ओळख वालंबा

मातेला लागलेली होती. 'तुझ्या उरी प्रत्यक्ष भगवंत जन्म घेईल' असा स्वप्नदृष्टांत हनुमंताने 'वालंबा' मातेला दिला होता. हा दृष्टांत त्यांनी आपले पती लक्ष्मणबाबा यांना सांगितला.

**''वालंबा माता भाग्यवंत । गर्भ राहिला उदरात ।**
**डोहाळे होती तिजप्रत । वदे काय बाबासी ।।१५८।।**
**काल रात्री निद्रित । स्वप्नी आला हनुमंत ।**
**म्हणे बाई भगवंत । कूस तुझी उजळेल ।।''** [२५]

वालंबा मातेस हनुमंताच्या झालेल्या दृष्टांतानुसार महाराजांचे नाव 'मारुती' असे ठेवण्यात आले. इ. स. २३ ऑक्टोबर, १८६६ रोजी महाराजांचा जन्म झाला.

**''द्वादशदिनी पाळण्यात । घातला प्रेमभावे पुत्र ।**
**नाव मातेशी पुसत । ठेवा 'मारुती' ।।१९४।।**
**मारुतीराय रामदूत । येऊन सांगे स्वप्नात ।**
**यास्तव मारुती सांगत । मंगल नाम तयाचे ।।''** [२६]

तत्कालीन रूढी समजुतीनुसार वालंबा मातेने आपल्या मुलाच्या भविष्याकरिता ज्योतिषाकडे विचारणा केली. हा बालक कुळाचा उद्धारक ठरेल असे ज्योतिषाने सांगितले.

**'राजर्षि हा भाग्यवंत । कीर्ती दिगंतरी वाढेल ।।**
**महान योगी होईल । प्राणिमात्रा उद्धारेल ।।**
**नाव कुळाचे वाढवील हे बालक तेजस्वी ।।२०३।।'** [२७]

**महाराजांचे शिक्षण**

शिक्षण हा मानवी जीवनाच्या उद्धाराच्या प्रक्रियेतील अत्यंत मौल्यवान असा घटक आहे. शिक्षणाने स्वावलंबन आत्मजागृती, व्यक्तिमत्त्वाची जाणीव इ. घटकांचा विकास होतो. त्यामुळेच राम, कृष्ण इ. प्रभुतींनी गुरुगृही जाऊन शिक्षणाचा लाभ घेतल्याचे आपणास दिसते.

मारुती महाराज ज्या बुलढाणा जिल्ह्यातील माकनेर या क्षेत्री लहानाचे मोठे झाले, तो भाग अति मागास होता. तो कालखंड ग्रामीण भागातील शिक्षणाचा प्रारंभीचा कालखंड होय.

**'पाणी, कागद, लेखन । झाले नव्हते निर्माण अक्षर।।**

**वळण्या रुईपान धूळपाटी लिहिण्याशी ।।३५।।'** [२८]

गावातील रामजी आणि उदयभान या पाटील मंडळींच्या प्रयत्नाने गावठी शाळा स्थापन झाली. बापू जामले यांची शिक्षक म्हणून नेमणूक झाली. मारुती महाराजांचे प्राथमिक शिक्षण त्यांच्याच मार्गदर्शनाखाली सुरू झाले. महाराजांमधील अलौकिक बुद्धी–सामर्थ्य जामले गुरुजींच्या लक्षात आले. महाराजांना शिक्षण देण्यापेक्षा आपणच त्यांचे शिष्यत्व पत्करावे अशी इच्छा त्यांच्या मनात निर्माण झाली.

**'मारुती घेता शिक्षण । प्रश्न पुसे विलक्षण ।**

**करू न शके समाधान । शिक्षक बापू तयाचे ।।३७।।**

**गुरु म्हणे मी नाम मात्र । शिक्षक बाळाचा शोभत ।**

**तर्क मजपुढे धावत । मीच शिष्य तयाचा ।।३८।।**

**अरे हा तर बृहस्पती । तेजस्वी ज्ञान गभस्ती।**

**संदीपान गुरुकुटी । जै श्रीपती स्वयंभू ।।३९।।**

**बालयोगी यापरी । लेखन वाचन करसे ।**

**तरी होई धूळपाटीवरी । पुढे वाढवी अभ्यासे ।।४०।।**

**नसे लक्ष खेळण्यात । भजन पुजनी असे चित्त ।**

**दिसे विरक्त मानसात। सर्वातुनी वेगळा ।।४१।।'**[२९]

महाराज लौकिकार्थाने शाळा, महाविद्यालयात जाऊन उच्च विद्येने विभूषित झालेले नसले, तरी आध्यात्मिक जीवनाच्या शाळेत शिकून मोठे झालेले होते. तेच त्यांचे खरे शिक्षण होते. कारण डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी एके ठिकाणी असे सांगितले आहे की, 'सद्‌गुणांचे प्रत्यक्ष आचरण आणि अंतिम सत्याच्या शोधाच्या संदर्भात मानवी आत्म्याचे प्रशिक्षण करून म्हणजेच उन्नयन करून आध्यात्मिक जीवनात प्रवेश करणे म्हणजे खरे शिक्षण होय.' [३०]

या दृष्टीने विचार करता महाराजांचे शैक्षणिकदृष्ट्या परिपूर्ण व्यक्तित्व होते. असे म्हणावे लागेल. 'सा विद्या या विमुक्तयें ।' असं विद्येच्या बाबतीत म्हटले जाते. म्हणजेच तेच खरे शिक्षण, ज्ञान जे मानवाला सामाजिक, सांस्कृतिक, वैचारिक, मानसिक गुलामगिरीतून मुक्त करते. ते खरे शिक्षण घेऊन महाराजांनी समाजाला सर्व पातळीवर वरील सर्व गुलामगिरीतून मुक्त करण्याचा प्रयत्न केला. म्हणजेच विद्येचा नेमका अर्थ त्यांना कळला होता व तो त्यांनी आपल्या कार्याच्या माध्यमातून आचरणात आणला होता.

**महाराजांचा विवाह व कौटुंबिक पार्श्वभूमी**

तत्कालीन सामाजिक रूढीनुसार मारुती महाराजांचा विवाह वयाच्या बाराव्या वर्षी शेलापूर गावाच्या बापू पाटील बावस्कर यांची कन्या 'कौतुका' यांच्याशी झाला.

**''।। द्वादश वर्षीय मारुती । विवाह सुयोग्य समजती ।**
**वधू केली निश्चित । लक्ष्मण बाबांनी ।।४४।।**
**वैष्णव भक्त वतनदार । बापू पाटील बावस्कर ।**
**ग्रामतयांचे शेलापूर । नळगंगा किनारी ।।४५।।**
**तया कन्या सुलक्षणी । कौतुका नामे गौरवर्णी ।**
**सद्‌गुण सुवर्णखाणी । चालुती ये अवचित ।।४६।।**
**मारुतीवर देखून । बापू पाटला समाधान ।**
**तैसी कौतुका बघून। बाबा संमती देतसे ।।४७।।**
**शेलापुरी झाले लग्न । सोहळा आटोपे निर्विघ्न ।**
**बाबा जाहले प्रसन्न । कार्यबघून अखेरचे ।। ४८।।''**[३१]

पुढे त्यांना गोविंद, आनंद, तुळशीराम, मुरलीधर अशी चार मुले व तुळसा आणि शकुंतला या मुली अशी सहा अपत्ये झाली. आपल्या मुलांवर त्यांनी पहिल्यापासूनच शालेय शिक्षणाबरोबरच भगवद्‌भक्तीचे संस्कार केले. तुळशीरामाचे बालपणीच निधन झाले. चि. गोविंद पुढे 'योगीराज गोविंद महाराज' म्हणून प्रसिद्धीस आले.

**महाराजांचा वंशवृक्ष आलेख**

- जयसिंह ढोले (पणजोबा)
  (सरदार ढोले पाटील–वतनदार–सिंदीलासुरे, ता. खामगाव)
  - निंभासिंह ढोले (आजोबा)
    बाकाबाई (निंबाजीसिंहाची पत्नी)
    - रामजी (काका)
    - लक्ष्मण बाबा (वडील)
      वालंबा माता (आई)
      - महादेव
      - गोविंद
      - श्री मारुतीराया
        - कौतुकाबाई (पत्नी)
          - श्री गोविंद महाराज
          - आनंद महाराज
          - तुळसाबाई
          - तुळसीराम
            - शकुंतला (ताराबाई)
            - मुरलीधर (बाबू)
      - सावित्री
        - भाऊजी मुलगा
      - मिरा
        - रामदास
        - हरदास
        - संपत (मुले)
      - भागिरथी
        - म्हादू, दौलत (मुले)
        - कवतुका (मुलगी)

**वारकरी संप्रदाय आणि मारुती महाराज**

महाराष्ट्रातील तळागाळातील लोकांना आपलासा वाटणारा संप्रदाय म्हणजे वारकरी संप्रदाय होय. संत ज्ञानेश्वर पूर्वकाळात नाथपंथ आणि महानुभाव पंथाचे अस्तित्व महाराष्ट्रात होते. महानुभाव पंथ हा त्यांच्या मर्यादित आचार धर्मामुळे लोप पावत गेला. नाथपंथ पुढे भागवत धर्मात विलीन झाला.

ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, तुकाराम इ. संतमंडळींनी मानवतावादाची शिकवण देणाऱ्या सर्वसमावेशक वृत्ती धारण करणाऱ्या व जीवनविषयक प्रसन्न दृष्टिकोण देणाऱ्या वाङ्मयाची निर्मिती करून अठरा पगड जातिधर्मांना वारकरी संप्रदायाच्या छायेखाली आणले व इंद्रायणीच्या वाळवंटात हरिनामाच्या गजरात सर्वांना एकरूप करून टाकले.

आचार, विचार शुद्ध ठेवावेत, गळ्यात तुळशीमाळ घालावी व आषाढी, कार्तिक, माघी व चैत्री यांपैकी एखाद्या शुद्ध एकादशीस पंढरपूरला जाऊन पांडुरंगाचे दर्शन घ्यावे. असा सर्वसाधारण आचार धर्म या पंथास अपेक्षित आहे. त्यामुळेच वारकरी पंथाचे अभ्यासक शं. वा. दांडेकर म्हणतात की, 'आषाढी, कार्तिकी, माघी व चैत्री यापैकी एका शुद्ध एकादशीस पंढरपूरला जाणारा तुळशीची माळ घालणारा तो पंढरपूरचा वारकरी व त्याच्या उपासनेचा मार्ग म्हणजे वारकरी पंथ होय.'[३२]

श्री संत मारुती महाराज यांना आपल्या मातुश्री 'वालंबा' यांच्या माहेरकडून वारकरी संप्रदायाचे संस्कार लाभलेले होते. आई, वडीलबंधू यांच्यासोबत देवळात जाणे, आरती, अभंग, संतचरित्र श्रवण करणे, कथन करणे इ. गोष्टींकडे त्यांचे लक्ष लागले.

**''माता नेई राऊळात । देखुनी रामसीता हनुमंत ।**
**मन तल्लीन होतसे ।।५३।। थोरला बंधू मारुतीस ।**
**नेई पुराण श्रवणास । कार्तिकी काकड आरतीस ।**
**नित्यनेमे जातसे ।।५४।।''** [३३]

अकोला, बुलढाणा, वऱ्हाड, खानदेश इ. परिसर हा संतकीर्तनात प्राचीनकाळापासूनच रममाण झालेला होता. संत झेंडुजीबुवा खानदेशकर, नागोजी महाराज तळेकर, संत सखाराम महाराज इ. संतसज्जनांनी मोठ्या भक्तिपूर्ण अंत:करणाने वारकरी पंथाची पताका या भागात अभिमानाने मिरविली व लोकांवर भागवत भक्तीचे संस्कार केले. मारुती महाराज या वारकरी परंपरेचे पाईक बनले.

**''समर्थ मारुती काळात। सखाराम थोर संत।**

**जाती तया सोबत। श्री समर्थ पंढरीला ।।४७।।**

**दिंडी घेऊन स्वतंत्र। उच्चरवे भजन गात।**

**पदयात्रा करित। वैष्णव भक्त आनंदे ।।४८।।''**[३४]

संत झेंडुजीबुवा खानदेशकर यांनी एदलाबाद कोथळी येथील 'संत मुक्ताबाईंच्या' समाधीचा शोध घेऊन एक छोटेखानी देऊळ बांधले व वार्षिक पुण्यतिथी सोहळ्याची परंपरा सुरू केली. पुढे 'संत मारुती महाराज' याच ठिकाणी वारीस जाऊ लागले. नाशिक, त्र्यंबकेश्वर, आळंदी, पंढरपूर याही क्षेत्रांना त्यांनी वारीची परंपरा सुरू ठेवली, याप्रसंगी वारकरी पंथ प्रणित कीर्तन – भजनाचा सोहळा पार पडत असे. पुढे ब्रम्ह्मानुभूतीनंतर ते केवळ समाधी सुखात मग्न न राहता भोवतालच्या सामाजिक स्थितीचे निरीक्षण करू लागले व दांभिकतेवर हल्ले चढवून समाजसुधारणेचा त्यांनी सतत प्रयत्न सुरू ठेवला.

**''मारुती आता भवमुक्त । सदा मग्न चिंतनात ।**

**देह चिंता नुरत । आस एक देवाची ।।४१।।**

**तरुण मित्र टाळकरी । समुदाय साठाचे वरी ।**

**भजन गायन माझारी । डुलत भवानंदाने ।।४२।।**

**रात्री पुराण पठण । श्रोते होती तल्लीन।**

**सन्मार्गाचे वळण । ग्रामजना लागले ।।४३।।''** [३५]

थोडक्यात, मारुती महाराज तुकोबासारखे प्रसंगी कठोर बाण्याच्या वृत्तीचे अनुकरण करणारे संत होते असे दिसते. आत्ममग्न संतत्वापेक्षा समाजसन्मुख संतत्वाला त्यांनी प्राधान्य दिलेले दिसते. यावरूनच ते वारकरी पंथाच्या परंपरेचे निष्ठावान अनुयायी होते. याची साक्ष पटते.

### श्री मारुती महाराज यांची गुरूपंरपरा

भारतीय संस्कृतीत गुरुपंरपरेला अनन्य साधारण असे महत्त्व आहे. आपल्या समाजमान्य निरनिराळ्या धर्मग्रंथात त्यांची माहिती मिळते. उदा. मुण्डकोपनिषद, भगवद्‌गीता. महर्षी पतंजली योगदर्शन, गुरुगीता, याज्ञवल्क संहिता, महाभारत, रूद्रयामल, तंत्रशास्त्र, दैवी मीमांसा इ. ग्रंथांमधून आपल्याला गुरूंचे महत्त्व व गुरु-शिष्याचे संबंध यांची माहिती मिळते. त्याचबरोबर आपल्या सर्व अवतारी पुरुषांनी गुरू केल्याचे उल्लेख सापडतात. उदा. मत्स्यावतारी मांघात, कच्छावतारी सहजानंद, वराहवतारी कंकऋषी, नरसिंहावतारी दुर्वास, वामनावतारी ब्रह्मदेव, परशुरामावतारी शंकर, रामावतारी वरिष्ठ आणि कृष्णावतारी संदिपनी अशी पौराणिक गुरुपंरपरा दिसते. आदिनाथ, मच्छिंद्रनाथ, गोरक्षनाथ, गहिनीनाथ, निवृत्तीनाथ, ज्ञाननाथ (ज्ञानदेव), विसोबा खेचर, नामदेव, सच्चिदानंद बाबा, विश्वंभर, राघवचैतन्य, केशवचैतन्य, बाबाजी चैतन्य, तुकाराम अशीही गुरूपरंपरा पहावयास मिळते. रामकृष्ण परमहंस, स्वामी विवेकानंद तसेच स्वामी स्वरूपानंद या सर्वांनीच आपल्या गुरुपरंपरेचा उल्लेख केला आहे व आपल्या गुरुपरंपरेला आदराने वंदन केले आहे.

संत साहित्यात सद्‌गुरुचे महत्त्व मोठ्या आत्मीयतेने मांडलेले दिसते. सगुण-निर्गुण या दोन्ही पातळीवर सद्‌गुरूंचे स्वरूप विशद करून सद्‌गुरू हेच परब्रह्म आहेत असे सांगितले आहे. त्यामुळेच 'गुरू ब्रह्म दोन्ही समान । हे ही उपमा किंचीत न्यून ।।'[३६] असे एकनाथ महाराजांनी सद्‌गुरूंचे स्वरूप वरीलप्रमाणे मांडलेले आहे.

मारुती महाराजांच्या बाबतीत मात्र कोणतीही गुरुपरंपरा दिसत नाही. त्यांनी कोणालाही गुरू करून घेतले नाही. याबाबतीत संत तुकाराम आणि माकनेरकर महाराज यांच्यात काही प्रमाणात साम्य दिसते. कारण तुकारामांनीही प्रत्यक्षात कोणालाही गुरू केलेले नाही. तसेच त्यांनी स्वत:हून कोणाला शिष्यही केलेले नाही. त्यामुळे आचार-विचारांच्या बाबतीत मारुती महाराज माकनेरकर हे तुकोबांचे अलीकडील वारसदार आहेत असे म्हणता येते. संतवचने अखंड प्रमाणात मानून त्यांनी आपली आध्यत्मिक वाटचाल सुरू ठेवली. संतवचनांचा

अंगीकार केलेला दिसतो. ''सद्गुरू म्हणजे देहधारी जडमूर्ती या भावने युक्त आहे असे जाणले पाहिजे. गुरू म्हणजे बुद्धीचे अतीत असलेला आत्मा होय दुसरे काही नाही हेच सत्य''[३७] श्री. म. वैद्य यांच्या या मताचा स्वीकार केला तर मारुती महाराजांनी आपल्या पूर्वसूरींच्या संत माहात्म्यांचे विचार प्रमाण मानले होते असे दिसते.

सद्गुरू हे शिष्याला अंधारातून प्रकाशाकडे जाण्याचा मार्ग दाखवित असतात. आपल्या उपदेशाच्या माध्यमातून सर्व दुर्गुणांचा ते नाश करतात. त्यांच्या संस्कारामुळे त्यांच्या सहवासात येणाऱ्या प्रत्येक साधकाचा जणू पुनर्जन्म होत असतो. गुरुविषयी आपले मत व्यक्त करताना मारुती महाराज म्हणतात,

**।। गुरू म्हणजे महान । गुरू जगती कोण? ।**

**जो नराचा नारायण । होतो तो श्रीगुरू ।।२०४।।**

**आत्मप्रकाश पाहतो । परब्रह्म जाणतो ।**

**स्वयेचि ब्रह्म होतो । त्या नाव श्रीगुरू ।।२०५।।**[३८]

हाच विचारांचा धागा पुढे नेत महाराज म्हणतात, ''खरा गुरू आत्मप्रकाश शोधता शोधता स्वत:च ब्रह्ममय झालेला असतो. सर्वकाळी अंतर्ज्ञान जिवंत ठेवणारा तो सज्जन असतो. आपले गुरूत्व कोणी स्वीकारावे म्हणून तो खटपट करीत नसतो, तर उदार हस्ते स्वत:च्या संपर्कात येणाऱ्यांच्यावर तो कृपा करतो. निसर्गाप्रमाणे समन्यायाने सर्वांवर प्रेमछायेचा वर्षाव करतो. तसेच अशाच सद्गुरूंच्या कृपाप्रसादासाठी त्यांचे मन तळमळत असते. अशाच सद्गुणी व्यक्ती त्यांच्या कृपेस पात्र ठरतात''[३९]

असे सद्गुरू म्हणजे संत होय. सद्गुरू फक्त शिष्याला उपदेश करतात तर संत सर्वांना त्यांच्या अधिकारानुरूप उपदेश करतात. संतांचा उपदेश हा मेघातून वर्षाव करणाऱ्या पावसासारखा असतो.

त्यामुळेच संत तुकाराम म्हणतात, 'उपदेशी तुका। मेघवृष्टी ते ऐका ।' असे संत हेच माकनेरकर महाराजांचे गुरू होत. येथे समाजात गुरूंचे वाढलेले स्तोम कमी करण्याचाही माकनेरकर महाराज जो प्रयत्न करतात तो तुकोबांनीही केलेला आपणास दिसतो.

गुरू शिष्यत्वाच्या बाबतीत मारुती महाराजांनी घेतलेली भूमिका पाहता ते चरित्रसंपन्न व निष्ठेने ज्ञानसाधना करणारे स्वयंभू व्यक्तिमत्त्व होते हेच दिसून येते.

**''।। नच त्यांना कोणी गुरू। न ते कुणाचेही गुरू ।**

**स्वयंप्रभा सद्‌गुरू । पूर्वीचेच जगाचे ।।४८।।''** [४०]

तात्पर्य, माकनेरकर महाराजांनी संतांनाच आपले गुरु मानले.

**आध्यात्मिक साधना (साधकावस्था)**

कोणत्याही साक्षात्कारी संतत्वाच्या व्यक्तिमत्त्वाला आध्यात्मिक साधनेचे अधिष्ठान असते. आध्यात्मिक साधना ही साधी गोष्ट नव्हे. काम, क्रोध, मद, मत्सर या सहा रिपूंच्यावर विजय मिळवीत अंतिम सत्याकडे साधकाला वाटचाल करावी लागते. संतश्रेष्ठ ज्ञानदेवांच्या पासून आजच्या युगातील स्वामी स्वरूपानंदांच्या पर्यंत सर्व संतसज्जनांची संतत्वाची वाटचाल आध्यात्मिक साधनेमुळेच झालेली दिसते.

मारुती महाराजांची आध्यात्मिक साधना वरील संतप्रभावळीसारखीच होती. निरपेक्षवृत्तीने संसार करावा, संतभजनी सर्वलक्ष केंद्रित करावे, हातापायाने कष्ट करावेत, मनाने गीता भागवताचे चिंतन करावे असा त्यांचा नित्यनेम होता. या संदर्भात ते म्हणतात,

**।। निर्वाहासाठी काम । कामांत चिंतन नाम ।।१।।**

**काम हाताने पायाने । गीता भागवत मनाने ।।२।।** [४१]

साधकावस्थेमध्ये महाराजांनी आपल्या दैनंदिन कर्माचा त्याग केलेला नव्हता. महाराज आपल्या कामातच परमेश्वराच्या नामस्मरणाचा आनंद घेत. शेतात नांगरणी, वरखणी, पेरणी, राखणी, कापणी इ. कामे करीत असताना सर्वत्र राम, रामरूप त्यांना दिसत असे. त्यामुळे कोणत्याही कामाचे कष्ट त्यांना वाटत नसे.

**।। विळा चाले सपासप। मुखी रामनाम जप ।**

**दिसे शेत रामरूप । कष्ट तयात भासेना ।।११३।।''** [४२]

उदरनिर्वाहाचे दुसरे एक साधन म्हणून महाराजांनी वाण दुकान टाकले होते. दुकानात काम करता करता त्यांचे मन रामनामात सहजच तल्लीन होऊन जात असे.

**'' शरीर वाणकाम करी। परी नाम अंतरी ।।**

**चित्तवृत्ती तदाकारी । मन:शांती लाभत ।। १२७ ।।''** [४३]

मारुती महाराजांनी आपल्या या कृतीतून ज्ञानदेवकृत 'कर्मे इशु भजवा' हा कर्मयोग सांगितला आहे. तसेच 'दळिता कांडिता। तुज गाईन अनंता।।' किंवा 'कांदा मुळा भाजी। अवघी विठामाई माजी।'असे म्हणणारे सांवता माळी, संत जनाबाई इत्यादी संतमंडळी संसार करता करता परमेश्वर, आपला कसा करावा हेच सांगून गेली. तोच वारसा माकनेरकर महाराज आपल्या विचारातून चालविताना दिसतात.

हरी भजनी लागलेल्या महाराजांना हळूहळू आध्यात्मिक क्षेत्रातील संकेत मिळत गेले. म्हणूनच त्यांच्या घरातील अंगणांत अचानक एके दिवशी कफनी परिधान केलेला जटाधारी योगी उभा राहिला व महाराजांना म्हणाला 'भजन करीत रहा' व अचानक निघून गेला. त्याचबरोबर माकनेरक्षेत्री कीर्तन करण्यासाठी येणाऱ्या 'भगवान बाबांनी' त्यांना 'मुंग्यास साखर टाकीत जा' असा उपदेश केला व तो नियम महाराजांनी प्रकर्षाने पाळला.

**''साधू वदे मारुतीस । घाल साखर मुंग्यासी ।**

**आणि पाणी तुळशीसी । नेम कधी चुकू नको ।।११९।।''** [४४]

पुढे महाराजांनी गीता, भागवत, ज्ञानेश्वरी यासारख्या ग्रंथाचे वाचन, श्रवण, मनन करण्यास सुरुवात केली. श्रीक्षेत्र आळंदी येथे जाऊन ज्ञानेश्वरीचे वाचन सुरू केले. तिथे त्यांना ज्ञानदेवांचा स्वप्नदृष्टांत झाला.

**''स्वप्नी ज्ञानेश प्रगटत। तेज मुखी झळकत।**

**शिरी हस्त ठेविला।।६७।। वदे अरे बा मारुती।**

**तू तो माझीच मूर्ती। अध्यात्म ज्ञानदीप्ती।**

**तव ह्रदयी प्रगटेल।।६८।।''** [४५]

ज्ञानदेवांच्या दृष्टांतानंतर मारुती महाराजांनी गावातील राम मंदिरात कीर्तने, प्रवचने करण्यास सुरुवात केली. साधी, सोपी, सरळ भाषा, प्रासादिक वाणी, दृष्टांताची पेरणी या भाषिक गुण वैशिष्ट्यांमुळे महाराजांची कीर्तने जनसामान्यांचा ठाव घेऊ लागली.

**''ब्रह्मरस कीर्तनात। आकंठ सेविती भक्त।**

**वाग्देवी तयाप्रत। प्रसन्न हस्त जोडोनी।।१७८।।**

**समय कीर्तन कला। आगळी भासे श्रोत्याला।**

**साध्य नसे इतराला। मुग्ध होती भाविक।।१७९।।''** [४६]

कीर्तनभक्तीने महाराजांच्या आंतरबाह्य मनात परिवर्तने सुरू झाली. आत्मदर्शनाची ओढ मनास लागली. सर्वत्र हरी चिंतनाशिवाय क्षणभंगुरता वाटू लागली. पण सांसारिक कर्माचा त्याग मात्र त्यांनी केला नाही. तरी यातना सोसत भगवंताच्या भेटीची आस त्यांच्या मनाला लागली. या स्थितीचे वर्णन करताना महाराज म्हणतात,

**''आसनी शयनी भक्तीचा अभ्यास। भोगोनिया त्रास संसाराचा।।१।।**

**संसार करोनी भक्ति केली पाही। रूसलो नाही संसारासी।।२।।''**[४७]

'समाजाचे कल्याण व्हायचे असेल तर संतवचनांची कास धरली पाहिजे. संतांनी सांगितलेल्या मार्गावरूनच रामकृष्ण गेले. आर्यावत गेले, त्यामुळे ते दिग्विजयी ठरले''[४८] असे महाराजांचे मत आहे. म्हणूनच सामान्य माणसांनी संतांना शरण जाणे इष्ट ठरेल. संतांना शरण गेल्यानेच संसार फलद्रूप होईल असा विश्वास त्यांना वाटतो म्हणूनच ते म्हणतात, ।। उद्धार होतो संत वचनाने। फलप्राप्ती पूर्ण संसाराची।।''[४९] महाराजांनी संतवचनाचे सामर्थ्य ओळखून त्यानुसार मार्गक्रमणा सुरू ठेवली व त्यांचे आध्यात्मिक अधिष्ठान अधिकच बळकट होत गेले. 'जड विश्वाची'[५०] अनंत कोडी त्यांना उलगडू लागली.

**''।। संतांची ती कृपा झालिया वरी।**

**आल्या त्या अंतरी प्रतित ही।।३ ।।''** [५०]

संतवचनाने सुगंधित झालेले महाराजांचे मन संसारातील अनंत अडचणींना सहज सामोरे जाऊ लागले. 'नेत्री ध्यान मुखी नाम'[५१] अशी त्यांची सदैव साधनेची वाटचाल सुरू झाली. संसारात हळूहळू विरक्तीची भावना वाढू लागली.

**।। संसार करोनी संसार ना चित्त। भेटला साक्षात आत्माराम।।''**

अशी त्यांची वृत्ती बनली. भजन, कीर्तन, प्रवचन विरक्तीपूर्ण सांसारिक कर्मे ही जणू महाराजांची दिनचर्या बनली. त्यांच्या उपदेशातूनच अनेक सामान्यजनांना जीवनाचा आधार मिळू लागला. सर्वार्थाने विरक्ती आलेल्या महाराजांच्या मनाला मात्र आपली वाणी ही आपली नसून भगवंताचे निरोप सांगणारी फक्त 'मध्यमा वाणी' आहे असे वाटू लागले.

**।। आत्म्याचा निरोप तोचि मी करीन। स्वमत सोडून दिले असे।।'**[५२]

थोडक्यात, नम्रता, वैराग्य, अहंचा त्याग अंत:करण शुद्धी अशा पद्धतीने त्यांची साधना सुरू होती.

**साक्षात्कार**

आध्यात्मिक जीवनामध्ये साक्षात्काराला फार महत्त्वाचे स्थान आहे. ईश्वरी साक्षात्काराबाबत रा. द. रानडे म्हणतात, ''आपले मन पूर्णपणे ईश्वराच्या नामस्मरणात रममाण झाले की, येणारी अनुभूती म्हणजे साक्षात्कार होय.'' त्याचबरोबर एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे साक्षात्काराचे वर्णन करता येत नाही. तो अनुभूतीचा विषय असतो. त्यामुळेच रा. द. रानडे यांच्या 'मराठी संत वाङ्मयातील परमार्थ मार्ग' या ग्रंथात 'प्लेटो' सारख्या तत्त्वज्ञाचे विचार उद्‌धृत केलेले आहेत. साक्षात्काराबाबत तो म्हणतो, 'या साक्षात्कारावर माझे कोणतेच लिखाण प्रसिद्ध झालेले नाही व कधीही प्रसिद्ध होणार नाही. कारण इतर शास्त्राप्रमाणे हा विषय चर्चा करण्यासारखा नाही. याविषयी काहीही विस्तृतपणे शब्दांनी व्यक्त करणे शक्य नसते व तो अनुभव जगास सांगता आला असता तर त्याने मानवाचे कल्याण झाले असते.

आणि मला त्यापेक्षा लिहिण्यास जास्त प्रिय असा विषयच राहिला नसता व मला निरतिशय आनंद झाला असता.'[५३]

बालपणापासून ईश्वराच्या नामस्मरणाची गोडी लागलेल्या मारुती महाराजांचे मन काळाबरोबर अधिकच हरी नामामध्ये तल्लीन होत गेले. त्यांनी दहा-बारा वर्षे पंढरीची पायी वारी केली. त्याचबरोबर देहू, आळंदी, त्र्यंबकेश्वर या ठिकाणीदेखील त्यांनी भेटी दिल्या. विशेष म्हणजे ते वारीची सुरुवात आदिशक्ती, मुक्ताबाईच्या दर्शनाने करीत. वारकरी प्रथेनुसार दशमी, एकादशी दिवशी ते मंदिरांमध्ये कीर्तन करीत. सर्वसामान्य जनांना सांसारिक व आध्यात्मिक जीवनात मार्गदर्शन करत. याचा परिणाम असा झाला की, 'देव झाला घर पाहुणा' अशी अनुभूती येऊ लागली. श्रीकृष्ण, श्रीराम, सीतामाई, तुकाराम, अवधूत स्वामी, जनार्दन स्वामी इत्यादी देवदेवता व संतमंडळी यांचे वेगवेगळ्या प्रकारे त्यांना दर्शन झाले''

**।। श्री समर्थ मारुती प्रत। जाहली ही कला प्राप्त।**
**देव देई दृष्टांत। अंतरूपे धरोनी।।११२।।** [५४]
**ज्ञानदेवांच्या कृपाशीर्वादाचे वर्णन करताना ते म्हणतात,**
**''।। ज्ञानेश्वर आले घरी। येऊनि बसले पलंगावरी।।**
**ओव्या सांगती वचनी। सत्य भरल्या गीतांतून।।२।।**
**मारुती म्हणे प्रसाद दिला। ओव्यारूपी ऐसा मला।।३।।** [५५]

या साक्षात्काराने अंतर्बाह्य सुगंधित झालेले महाराजांचे व्यक्तित्व, कवित्व अधिकच उजळून निघाले. ।। मारुती म्हणे ऐसा मिळाला प्रसाद। तेणे कीर्तने शब्द दुणावला।।१६।।[५६] अशी प्रचिती त्यांना व इतर मंडळींना येऊ लागली.

**सामाजिक कार्य : कीर्तन, ग्रंथरचना व इतर**

समाजातील तामसी वृत्ती नष्ट होऊन सात्त्विक गुणांची भरती यावी यासाठीच संतमंडळी प्रयत्नशील असतात. म्हणून देवदेवतांच्या उपासनेच्या नावाखाली काही अनिष्ट प्रथा कर्मठ प्रवृत्तीच्या स्वार्थी लोकांनी रूढ केलेल्या असतात. त्याला मारुती महाराजांनी विरोध केला; कारण ज्ञानदेवादी संतमंडळींच्या खऱ्या विचारांची ओळख समाजाला करून द्यावयाची होती.

**''मिळे ज्ञानेश आदेश। जना करावा उपदेश।**

**आडमार्गी प्रवेश।बहुतांचा जाहला।।१५७।।**

**नेत्री घालावे अंजन। अज्ञ करावे सुजाण।**

**अध्यात्म ज्ञानाची वाण। पडली या भूमंडळी।।१५८।।''** [५७]

त्यामुळेच माकनेर गावामध्ये दसऱ्याच्या वेळी रेडा किंवा बकरा यांचे शिर उडवून बळी देण्याची जी प्रथा कित्येक वर्षांपासून चालत आलेली होती. त्या प्रथेविरुद्ध महाराजांनी आपल्या कीर्तन व अभंगातून विरोध प्रकट केला. जनसामान्यांच्या मनात पशुहत्येविरोधी जागृती करून 'भूतदया हीच ईश सेवा' हा विचार रुजविला. 'हिंदूने जिवंत रेडा-गरीब प्राणी मारून पापांचे ओझे शिरावर का करावे? तुम्ही रेडा मारणे सोडून दिले पाहिजे. व्याघ्र मुखीची गाय सोडवावी हा मुख्य हिंदूंचा धर्म आहे.''[५८] असा उपदेश करून त्यांनी पशुहत्येमुळेच देव प्रसन्न होतो, हा अंधश्रद्धेला खतपाणी घालणारा विचार नष्ट करून, खऱ्या अर्थाने मानवधर्माची शिकवण दिली. चमत्कार हा समाजामध्ये नेहमीच कुतूहलाचा, उत्सुकतेचा ठरलेला विषय आहे. 'चमत्कार करील तो खरा संत' अशी सर्वसामान्य जनांची धारणा असते. ती संतांच्या विषयी त्यांच्या मनात असणाऱ्या 'भावा'मुळेच, पण याच भावाचा संधिसाधू लोक गैरफायदा घेतात. आपल्या हस्तकामार्फत आपल्या नावाभोवती 'नानाविध' चमत्कारांची वलये निर्माण करून समाजमनाला लुबाडत असतात. महाराजांनी अशा भोंदू साधक, हस्तकांचे कुटिल हेतू तर उघड पाडलेच, पण त्याचबरोबर कोणताही खरा साधुसंत हा कधीच चमत्कार करीत नाही असे सांगितले.

तत्कालामध्ये अनेक अनिष्ट रूढी-परंपरांचा सुळसुळाट समाजात होता. या सर्वांना महाराजांनी विरोध केला.

**''आपुला धर्म श्रेष्ठ। परि बनला निकृष्ट।**

**रूढी शिरल्या अनिष्ट। थट्टा जगात होतसे।।''**[५९]

पूजेचे अवडंबर, नवस, अंगारे, धुपारे, जादूटोणा, यज्ञयाग यामध्ये समाज गुंतला होता.

**''।। कुठे राहिला धर्म। कसे विपरीत कर्म।**

**माजे जगी अधर्म। नसे वर्म ठाऊक।।४८।।''** [६०]

महाराजांनी आपल्या विचारातून, कृतीतून समाजाला नेमके वर्म सांगितले. 'देवळावर कळस ठेवेल त्याला मृत्यू येतो' अशी एक त्या वेळी भ्रामक समजूत होती. महाराजांनी स्वत:च्या हस्ते 'पूजदा' या गावातील राममंदिरावर सुवर्ण कळस बसवून लोकांच्या मनातील अशा भ्रामक कल्पना हद्दपार केल्या. यंत्र युगातील अज्ञानाची महाराजांनी हेटाळणी केली.

**''।। जादू, टोणा, मंत्र। असे थोतांड सर्वत्र।**

**मंत्रून देवी ताइत। यंत्रयुगात अज्ञान।।५४।।** [६१]

ज्या ज्या वेळी परिसरात प्लेगसारख्या साथी येत त्या त्या वेळी महाराज मदतीला धावून जात. मनुष्यहानीच्या वेळी रात्री-अपरात्री जाऊन मृतदेहावर अंत्यसंस्कार करीत. दुष्काळाच्या कामावर मुकादम म्हणून काम करीत. सर्वांना मजुरीच्या स्वरूपात धान्य कसे मिळेल याची काळजी घेत. आपल्या सहवासात येणाऱ्या प्रत्येकाला त्यांनी उद्योगी, चारित्र्यवान बनविले .

**।। व्यसनिया आचार संपन्न। धर्मभ्रष्टा नीतिमान।**

**दुर्जना बनविशी सज्जन। बद्ध बनती मुमुक्षू।।२२।।**

**आळसी झाले उद्योगी। अकर्म कर्मयोगी।**

**उन्मत ते विरागी। साधक सिद्ध जाहले।।२३।।**[६२]

## साधी राहणी

परमेश्वराशी एकरूप झालेल्या मारुती महाराजांचे राहणीमान अत्यंत साध्या प्रकारचे होते. संतत्वाचे, साधुत्वाचे, वैराग्यदशेचे दर्शन बाह्य पोशाख, आहार, विहार यांच्या माध्यमातून घडविण्यापेक्षा संतत्व, साधुत्व हे अंतरंगात ठेवून, सर्वसामान्यांप्रमाणे राहणीमान ठेवून आपण समाजप्रबोधन करावे या विचारसरणीचे मारुती महाराज सदैव साध्या राहणीमानाचा आग्रह धरीत.

कीर्तनाद्वारे महाराज समाजप्रबोधन करीत. अनेक गावांमधून ते कीर्तनासाठी जात. प्रवासाचा स्वत: खर्च करीत. कीर्तनासाठी दिलेली बिदागी ते कदापिही स्वीकारत नसत.

**''।। कीर्तन जाती समर्थ। बुक्का न भाळी लावत।**

**कंठी माला न घालत। पैसा तबकात न घेती।।१७५।।**

**घेऊ न देती दर्शन निरपेक्ष व्रते कीर्तन।**

**सत्यमार्गी दर्शन। भीड नसे कुणाची।।१७६।।**

**कीर्तन स्थळी न भोजन। रात्रीच करती गमन।**

**स्वग्रामी येऊन। करती भोजन आनंदे।।१७७।।** [६३]

एखाद्या भक्ताने फारच आग्रह केला तर 'मी हरिभजन करतो' असे सांगून मोठ्या प्रेमाने त्याच्या भेटवस्तू त्यालाच परत करीत. म्हणूनच अमरावतीच्या पांडुरंग तेली यांनी देऊ केलेले ३००/- रुपये, शांताराम वाढोडेकर यांनी देऊ केलेले १२००/- रुपये, नसिराबादच्या भिकू कोष्ट्यांनी देऊ केलेले २२०००/- रुपये महाराजांनी स्वीकारले नाहीत. ज्यांची मनरूपी थैली परमेश्वराच्या कृपाप्रसादाने भरून गेली होती. ते बाह्य वस्तूंची अपेक्षा कशी बरे धरतील! म्हणूनच त्यांनी आपला जमीनजुमला घर यांचीही आपल्या हयातीतच वाटणी केली व स्वत: मंदिरात राहण्यास गेले.

**''।। सद्‌गुरू मारुतीराय। दिसती जरी संसारात।**

**भास्कर स्थिर गगनात।। भ्रमताना भासतो।।२६।।**

**देहे करती संसार। मन झाले ईश्वर।**

**तयावरी सर्वभार दैवाधीन जीवन।।२९८।।** [६४]

### वैचारिक देव-घेव

महाराजांच्या काळात कबीर, शैव, आनंद, महानुभाव इ. संप्रदाय समाजात होते. या संप्रदायातील विविध शास्त्री, पंडित, महाराजांकडे वादविवादाच्या हेतूने येत. पण

आत्मानुभवाने समृद्ध असणारे माकनेरकर महाराज प्रत्येकाच्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे देऊन त्यांची मने जिंकून घेत. वादविवादाच्या हेतूने आलेले लोक अंतर्मुख होऊन निघून जात.

**।। श्री समर्थ मारुती। वादविवादी नसे मती।**

**परि प्रसंगोपती। व्हावे लागे सादर।।९ ।।**

**वादाचा श्रीगुरुप्रत। येती शास्त्री पंडित।**

**दर्प धरोनी मनात। मी अजिंक्य या जगी।।१० ।।**

**कुणी येती भाविक। शंकाखोर कित्येक।**

**प्रश्न पुसती अनेक। जाती नि:शंक होऊनी।।११ ।।**[६५]

वादविवाद करण्यासाठी येणाऱ्या लोकांच्याविषयी महाराजांच्या मनात आदर होता. महाराजांची वृत्ती स्वागतशील होती. म्हणूनच आपला भक्त निळोबा याला महाराज म्हणत,

**''माझ्या पेक्षा जर ते विद्वान असतील तर त्यांचे आपण ऐकून घेऊ.**

**त्याकरिता कमीपणा मानण्याचे काय कारण आहे.''**

मारुती महाराजांबरोबर वादविवाद करण्यासाठी उज्जैनचे पंडित, पंजाब प्रांतातील गोपीनाथ महाराज, पंजाबी महानुभावी महंत डॉ. कुर्तकोटी शंकराचार्य, अमरावती येथील बुद्धिवादी प्रिन्सिपॉल गोखले, थिऑसॉफिकल सोसायटीचे कारभारी बोधनकर वकील, निरश्वरवादी पेंडसे वकील, ज्येष्ठ वारकरी संत विष्णुबुवा जोग, त्यांचा शिष्य बंकटस्वामी, मलकापूरचे तहसीलदार, पोलीस निरीक्षक, ख्रिस्ती धर्मगुरू इ. विविध प्रांतातील, जातिधर्मातील लोक, वेदउपनिषद, गीता भागवत, बायबल, कुराण इ. धर्मग्रंथांचे अभ्यासक, चिंतक महाराजांबरोबर वादविवाद करण्यासाठी येत. आत्मानुभवी मारुती महाराज त्यांच्या वादविवादामध्ये संवाद घडवून आणून त्यांच्या मनातील शंका काढून टाकत.

**''।। ते उच्च श्रेणीत। अंगी मुरले अद्वैत।**

**आपण त्यांचे माहात्म्य। न जाणू शकेची।।७४ ।।''**[६६]

अशी कबुली देत वादविवादाच्या निमित्ताने आलेले पंडित महाराजांचा गौरव करीत निघून जात. या संदर्भातील काही महत्त्वपूर्ण प्रसंग पुढीलप्रमाणे आहेत.

**बंकटस्वामींचे गर्वहरण**

तत्कालीन ज्येष्ठ वारकरी विष्णुबुवा जोग यांचा शिष्य बंकटस्वामी महाराजांच्या कीर्तनास येत असे. महाराजांचे कीर्तन ऐकत असे. महाराज मूर्तिपूजेचे खंडन करू लागले की तो संतापून जाई. माकनेरकर महाराज पंढरीच्या वारकऱ्यांचे शत्रू आहेत असे लोकांना सांगू लागे. त्याने आपले गुरु विष्णुबुवा जोग यांच्याकडे तक्रार केली की,

**।। कथनी वेदांत ज्ञान। परि प्रतिमा खंडन।**

**ही विसंगती पूर्ण। आकळेना बुद्धिसी ।।७२ ।।''** [६७]

यावर जोग त्याला म्हणाले की, ''सर्वसामान्य कीर्तनात निरूपण प्राकृत आलेले असते. पण उच्च वेदांत तत्त्वज्ञान निरूपण करावयाचे झाल्यास सहजच मूर्ती खंडन होते. माकनेरकर महाराज स्वत: आत्मानुभवी आहेत व त्यांचे अंगी अद्वैत मुरलेले आहे. त्यांचे माहात्म्य आपण जाणू शकत नाही. त्यांच्या अवस्थेची कल्पनाही करू शकत नाही.'' विष्णुबुवा जोग यांच्या विचाराने शिष्य बंकटस्वामी संशयरहित झाले.

**प्रिन्सिपॉल गोखले :**

इंग्रजी व्यतिरिक्त दुसरी कोणतीही भाषा न स्वीकारणारे अमरावती मॉडर्न स्कूलचे प्रिं. गोखले महाराजांबरोबर 'आत्मप्रकाश म्हणजे काय?' या प्रश्नांवर वादविवाद करू लागले. तेव्हा महाराजांनी 'तुम्ही स्वामी विवेकानंदांचे इंग्रजी भाषेतील ग्रंथ वाचलेत काय? तुम्ही स्वामी विवेकानंदांचे ग्रंथ वाचा, म्हणजे तुम्हाला तुमच्या प्रश्नाचे जरूर उत्तर मिळेल'. असे सांगून विवेकानंदांचे ग्रंथ वाचण्यास त्यांना प्रेरित केले.

**गौतम महंत**

ब्राह्मणाव्यतिरिक्त इतरांना कीर्तनाचा अधिकार नाही असा कर्मठ विचारांचा गौतम नावाचा महंत होता.

''।। कुणबियांचे मुखातून। रामकृष्ण नामोच्चरण।

विटाळते माझे मन। ऐसे जना वदतसे ।।१०१।। [६८]

या कर्मठ महंतास महाराजांनी राम, कृष्ण, अर्जुन, संजय, वाल्मीकी, व्यास यांची उदाहरणे देऊन वर्णभेद करणे कसे चुकीचे आहे हे पटवून दिले.

''।। चातुर्वर्ण मिळून। आर्य धर्म निर्माण।

उच्चनीच विवरण। का आपण करावे? ।।१०९।। [६९]

असा सवाल करून जात्यांध्य गौतम महंतास महाराजांनी निरूत्तर करून जातीपेक्षा 'मानव' महत्त्वाचा आहे हा विचार सांगितला.

**देशभक्त साऊरकर**

बाबाराव साऊरकर नावाची देशभक्त व्यक्ती महाराजांना भेटण्यास येत होती. त्याचा देशभक्तीविषयीचा दिखावा महाराजांना मान्य नव्हता. महाराजांनी त्याला उपदेश केला. निस्वार्थी मनाने देशसेवा करावी. आपल्या आत्म्यात भारतमाता दिसावी. इतकी एकतानता आपल्या समाजसेवेत व देशभक्तीत असावी. महाराजांनी तत्कालीन देशभक्ताला केलेला उपदेश आजदेखील तितकाच उपयुक्त आहे।

''।। करा सुखे राजकारण। समाजकारण धर्मकारण।

परि त्यात ओतावा प्राण। नको स्वार्थ त्यामाजी ।।१७३।।

कर्म भिडावे अंतरात्म्यात। भारतमाता। दिसावी त्यात।

हितगुज करावे तिजप्रत। नको काज वरपांगी ।।१७४।। [७०]

**ख्रिस्ती धर्मगुरु**

एक ख्रिस्ती धर्मगुरु पंढरपूरच्या वाळवंटात भारतीय संस्कृती, हिंदू धर्म हा 'रानटी' आहे असा वाद घालीत होता. त्या वेळी त्याला महाराजांनी विरोध करून 'हिंदू संस्कृतीचे पुरातनपण, उदारता, मानवता पटवून देत, जो धर्म दुसऱ्या धर्माचा द्वेष करतो तो खरा धर्म नव्हे असे सांगितले. हिंदू धर्माचे व्यापकपण सांगितले व पटवून दिले.

**।। अमेरिकादी राष्ट्रात। विवेकानंद श्रेष्ठ।**

**हिंदूध्वज उभारित। विस्मृत काय जाहले।।१६७।।''** [७१]

**छळवादी कुशा ब्राह्मण**

माकनेर गावातील काही असंतुष्ट लोक महाराजांच्या कीर्तनाला, वारी दिंडीला नेहमी विरोध करीत. माकनेरच्या एका गावकऱ्याने तर मेंढा मारून महाराजांच्या दिंडी समोरच्या रस्त्याने ओढत नेला. मेंढ्याचे रक्त टाळकऱ्यांच्या पायाला लागले. पण महाराजांनी व त्यांच्या टाळकऱ्यांनी शांती सोडली नाही. अशाच मनोवृत्तीचा कुशा ब्राह्मण महाराजांना हरएक प्रकारे छळायचा. पण हाच पुढे महाराजांच्या आश्रयाला आला.

**जवळा गावीचा विद्वान संन्यासी**

चांदूरबाजार तालुक्यातील जावळा गावामध्ये एक विद्वान संन्यासी होता. तो संस्कृत भाषेत पारंगत होता. वेदांत जाणणारा होता. महाराजांच्या कीर्तनाच्या वेळी हजर राहून त्याने वेदांतावर अनेक प्रश्न विचारले. कीर्तनाद्वारे महाराजांनी त्यांना अपेक्षित उत्तरे दिली. पुन्हा एकांतामध्ये महाराजांना भेटून आपण एवढे सुरेख कीर्तन कसे करता? आपल्या कीर्तनाला लोक बहुसंख्येने कसे काय उपस्थित असतात? आपणाकडे काही सिद्धी आहे काय? असे विचारू लागले. त्या वेळी महाराजांनी सांगितले की,

**''।। आत्मज्ञान झाल्याविण। करू नये प्रदर्शन।**

**नाही तरी अपमान। कधी काळी होईल।।११४।।**

**तरी सोडी लोकेषण। प्रथमकरी शुद्ध मन।**

**कोरडेची शब्दज्ञान। येत नसे कामासी।।११५।।**

**स्वयें देव पाहावा। मग इतरां दावावा।**

**त्याविना कांगावा। करू नये जनात।।११६।।** [७२]

या निवेदनातून महाराजांनी भोंदू कीर्तनकार, प्रवचनकार यांचा समाचार तर घेतलेला दिसतो. पण त्याचबरोबर अनुभवाशिवाय लोकांना मार्गदर्शन करू नये, असा दंडक घालून दिलेला दिसतो.

**भक्त परिवार**

महाराजांच्या सच्चा साधुत्वाचा, संतत्वाचा परिचय समाजाला वेगवेगळ्या प्रसंगातून येत राहिल्यामुळे त्यांचा भक्त परिवारदेखील वाढत गेला. भोळ्या भाबड्या जनतेपासून ते उच्च विद्याविभूषित लोकही त्यांच्या भक्त परिवारात दिसून येतात. ज्ञानेश्वरांच्या दृष्टांतानुसार त्यांनी निळोबा टाकळकर यांचा शिष्य म्हणून स्वीकार केला. निळोबा टाकळकर हे महाराजांचे एकनिष्ठ भक्त होते. महाराजांचा गौरव करताना ते म्हणत,

**''।। हा माहात्मा, तपोधन। घ्या करून कल्याण।**

**जन्मोजन्मीचे बद्धमन। होईल शुद्ध सेवेने ।।१५ ।।''**[७३]

महाराजांच्या दिंडीचे वैभव वाढविण्यात त्यांचा सक्रिय सहभाग होता. महाराजांच्या आधीच ते निवर्तले. महाराजांच्या मंदिराशेजारीच त्यांची समाधी आहे.

महाराजांच्या व्यासंगनिष्ठ, अभ्यासपूर्ण कीर्तनाच्या प्रभावाने अनेक उच्च विद्याविभूषित मंडळी त्यांच्याकडे आकर्षित होत. डॉक्टर विठ्ठलराव गायकवाड हे त्यापैकीच एक गृहस्थ. त्यांनी सन १९३३ ते १९३८ या काळातील महाराजांची कीर्तने सर्व तपशीलासह व्यवस्थित लिहून ठेवलेली आहेत. त्यामुळे महाराजांच्या वाङ्मयाचा अभ्यास करणे सोपे झाले. केशवराव देशमुख शिरोळकर या भाविकांने महाराजांच्या जवळ सुमारे एक तप वास्तव्य करून आपापल्या गावी जाऊन महाराजांप्रमाणेच कथा, कीर्तन करून अनेक भाविकांचे जीवन संपन्न केले.

लक्ष्मणराव भोकरे हे गृहस्थ महाराजांचे भक्त होते.

**''।। अत्यंत साधी राहणी। परि उच्च विचारसरणी।**

**ईश्वरभक्त सुलक्षणी। परमार्थी आवड ।।१४३ ।।**

**चोख करूनी व्यवसाय। माकनेरी धावत जाय।**

**वत्सामाजी गुरुमाय। पान्हा पाजी प्रेमाचा।।१४४।।** [७४]

महाराजांच्या चरणी त्यांची श्रद्धा होती. पुढे त्यांना दुर्धर व्याधीने ग्रासले. महाराजांनी आपल्याला अवगत असलेल्या आयुर्वेद उपचारांनी त्यांना बरे केले. जीवनाविषयी आशा सोडलेले भोकरे पूर्ववत बरे झाले. महाराजांच्या आध्यात्मिक सामर्थ्याने आपली मृत्यूच्या दाढेतून सुटका झाल्याची त्यांची भावना झाली. पुढे व्यापार उद्योग, सहकार क्षेत्र, राजकारण, समाजकारणात त्यांची भरभराट झाली. त्यांनी पुढे माकनेर येथील मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी खूप मदत केली.

महाराजांच्या सेवेसाठी सर्वस्वाचा त्याग करून माकनेर क्षेत्री वास्तव्य करणारे अमरावतीचे वासुदेव श्रीधर ऊर्फ नाना खोत व्यवसायाने शिक्षक होते. मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेवर प्रभुत्व असणारे हे गृहस्थ गांधी विचारसरणीचे होते. आपल्या व्यक्तिमत्त्वाची महाराजांनी स्वप्नात दिलेली खूण ओळखून ते मोठ्या भक्तिभावाने महाराजांच्या सेवेत राहिले. अशाच प्रकारच्या दृष्टांताने समृद्ध झालेले नागपूरचे चिंतामणराव सुपारे महाराज हेही महाराजांचे निस्सीम भक्त होते. देऊळगाव राजा या गावातील इंग्रजी शाळेचे मुख्याध्यापक दादा बावरेकर, रेल्वेत नोकरीस असणारे इंग्रजी भाषेचे व्यासंगी नारायण जोशी, अण्याजी काळे, भीमराव जवळेकर, पप्पुसिंह दीक्षित इ. विद्वान मंडळी महाराजांच्या आध्यात्मप्रणव व्यक्तित्त्वामुळेच त्यांच्या संपर्कात आली व त्यांचे सच्चे अनुयायी बनून गेली.

याचप्रमाणे मठातील छोटी–मोठी कामे करणारे मोती गुरव, जानू धोबी, मारुती कलाल, सरूबाई देव, सरूबाई पाटील यांसारखी भोळी भाविक मंडळी महाराजांची सेवा करत.

**‘‘।। ऐसे ज्ञात अज्ञात। समर्थ सेवक अनंत।**

**कुणी मोजावे गगनात। तारे किती चमकती।।२२१।।**

**कुणी वाचाळ कुणी मौनी। कुणी भोळे कुणी ज्ञानी।**

**कुणी नसे अंतर्ज्ञानी। शास्त्री कुणी पंडित ।।१२२।।** [७५]

त्याचबरोबर महाराजांचे सुपुत्र योगीराज गोविंद महाराज, आनंद महाराज, मुरलीधर बाबू यांचाही समावेश महाराजांच्या भक्त परिवारात आपल्याला करावा लागेल.

**''।। श्री क्षेत्र माकनेरी। दैवी सोहळे वर्षभरी।**

**दुमदुमती ती नगरी। संकीर्तन, कीर्तने ।।१२१।।** [७६]

महाराजांच्या काळापासून सुरू असलेले सर्व धार्मिक कार्यक्रम, मेणा, दिंडी, कीर्तने, संतांचे–दैवदैवतांचे जन्मोत्सव, पुण्यतिथी इ. सर्व कार्यक्रम भक्तमंडळी मोठ्या निष्ठेने आजही करतात. विशेषत: संस्थानचे विद्यमान उपाध्यक्ष श्री. ओमप्रकाश देशमुख हे महाराजांच्या स्वप्न दृष्टांतामुळे माकनेर क्षेत्रीच राहण्यास आलेले आहेत. आपली परंपरागत घरची २५० एकराची जमीनदारी, राजकारण, समाजकारण दुय्यम ठरवून ते माकनेर क्षेत्री कार्य करताना दिसतात. मारुती महाराज बुलढाणा व अमरावती जिल्ह्यातील ज्या ज्या गावांना जात असत व कीर्तन करीत असत. त्या त्या गावामध्ये जाऊन कीर्तन व नामसप्ताह ओमप्रकाश देशमुख व इतर विश्वस्त मंडळी सध्या करतात. महाराजांच्या पुण्यतिथीला दरवर्षी पाच हजार भाविकांचा मेळा माकनेर क्षेत्री जमतो. सध्या १३ लोकांचे संस्थानचे विश्वस्त मंडळ आहे. अध्यक्ष श्री. रमेश पांडुरंग बारस्कर, डोंबिवली (ठाणे) तर उपाध्यक्ष श्री. ओमप्रकाश भिमराव देशमुख हे आहेत. सचिव, कोषाध्यक्ष, कार्यकारी विश्वस्त असे विश्वस्त मंडळ श्रीक्षेत्र माकनेरचा विकास करीत आहेत. मंदिराचा जीर्णोद्धार, धर्मशाळा, नवीन भक्त निवास, वाहन तळ, कीर्तन वाचन सप्ताह, पुण्यतिथी सोहळा, दिंडी सोहळा प्रतिवर्षी निष्ठेने पार पाडले जात आहेत.

### महानिर्वाण

भक्तिमार्गाने आचरण करणारे, संतधर्म वाढविणारे, समाजाचा उद्धार करण्यासाठी शेवटपर्यंत प्रयत्नशील असणारे, 'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती' या संत तुकाराम

महाराजांच्या वचनाप्रमाणे आपल्या कीर्तनाद्वारे वऱ्हाड, विदर्भातील बुलढाणा, अमरावती या जिल्ह्यातील सर्वभाग पिंजून काढून समाजप्रबोधन करणाऱ्या महाराजांना भाद्रपद वद्य – नारायण दशमी शके १८७० मंगळवार दि. २८ सप्टेंबर, १९४८ रोजी देवाज्ञा झाली. अधात्म प्रवण महाराजांनी आपला अंत:काळ जवळ आल्याने ओळखले. त्याच सकाळी त्यांनी सरूबाई पाटील या भक्त महिलेला स्वर्गीच्या देवदेवता मला निजधामास घेऊन जाणेस आल्या आहेत असे सांगितले.

**''।। एके दिनी सरूप्रत। सद्गुरूराय बोलत।**

**ओट्यावरी साधुसंत। मेळा पहा पातला।।५०।।**

**सुंदर मेणा आणिला। चलावे निजधामाला।**

**विनवितो ते मजला। निजदृष्टी पाहे तू।।५१।।**

**ऋषी मुनी नारद। झंकारित विणावाद।**

**टाळमृदंग निसार। पाचारिती मजलागी।।५२।।''**[७७]

आपला पुत्र मुरलीधर बाबू यास कीर्तन करण्यास सांगितले. कीर्तन संपल्यावर आपली मुले व भक्त परिवाराला सांगितले की,

**'' ।। माझे कार्य संपुष्ट। झाले ऐसे वाटत। अता निजधामाप्रत।**

**जाणे लागे मजलागी।।६९।। हे दिव्य आध्यात्मज्ञान।**

**पोचवा सर्वत्र महान। भवकंपी अज्ञजन।**

ॐअसा शब्द उच्चारित आपल्या देहरूपी जीर्णवस्त्राचा त्याग केला.

**महाराजांचे वाङ्मय**

महाराजांवर मुळातच 'संतधर्माचे' संस्कार झालेले होते. समाजातील सर्व स्तरातील लोकांना सर्व बाबतीत स्थिरता, संपन्नता लाभावी या हेतूने तसेच 'शहाणे करून सोडावे सकल जन' या उद्देशाने त्यांनी आपली साहित्य संपदा निर्माण केलेली दिसून येते.

वऱ्हाडातील सर्व गावांमधून भ्रमंती करीत असताना ते कथा, कीर्तन करीत. या प्रसंगी या प्रसंगी लोकांना ते जो उपदेश करीत असत तो उपदेश त्यांच्याबरोबरची इतर भक्त मंडळी ती लिहून ठेवत व रात्रीच्या वेळी महाराज स्वत: त्याची पहाणी करून त्यात सुधारणा करीत. मराठी भाषेबरोबरच हिंदी मधूनही त्यांनी रचना केलेली दिसते. कारण वऱ्हाडमधील काही भागात निजामाचे राज्य होते. त्यामुळे हिंदी भाषेचाही तिथे काही प्रमाणात अंमल होता. त्यामुळे संस्कारदृष्ट्या कोणीही उपेक्षित राहू नये म्हणून त्यांनी हिंदी भाषेतून रचना केलेली दिसते.

या साहित्यातील काही भागावर मुद्रणाचे संस्कार झालेले आहेत, तर काही साहित्य अजून हस्तलिखित स्वरूपात असून, मुद्रण संस्कारापासून अलिप्त आहे. श्रीमहाराजांची प्रकाशित व अप्रकाशित वाङ्मय रचना पुढील प्रमाणे आहे.

**अ) प्रकाशित वाङ्मय**

१. अध्यात्म कीर्तन रत्न भाग १, प्रकाशक : माकनेर संस्थान, इ. स. १९७२

२. अध्यात्म कीर्तन रत्न भाग २, प्रकाशक : माकनेर संस्थान, इ. स. १९७२

३. अध्यात्म कवितरत्न भाग ३, प्रकाशक : माकनेर संस्थान, इ. स. १९९९

४. सत्य अध्यात्म, प्रकाशक : माकनेर संस्थान, इ. स. १९६८

५. अभंग गाथा, प्रकाशक : माकनेर संस्थान, इ. स. १९९०

**ब) अप्रकाशित वाङ्मय**

१. पाचशे पंचवीस कीर्तने (इ. स. १९३३ – १९३६ या काळातील)

२. उपदेशपर गोष्टी

३. श्रीराम चरित्र

४. श्रीकृष्ण चरित्र

५. भगवद्गीता : मराठी अभंग रूपांतर

६. दोनशे हिंदी अभंग

७.	म्हणींचा संग्रह व औषधी संग्रह

८.	आर्य समाज सणांची सुधारणा

९.	संसार सुधारणा

**समारोप**

मारुती महाराज माकनेरकर यांच्यावर बालपणापासूनच वारकरी संप्रदायाचे संस्कार झाले होते. कौटुंबीक जीवन जगत प्रपंच परमार्थरूप कसा करता येतो हे महाराजांनी समजावून दिले.

ज्ञानेश्वरांपासून सुरू झालेल्या वारकरी संप्रदायाची परंपरा वऱ्हाड, बुलढाणा या प्रांतात महाराजांनी आपल्या परिने चालविली. आजूबाजूच्या परिसरात निरपेक्ष वृत्तीने कीर्तन, भजन, दिंडी असे सोहळे करीत समाज प्रबोधन केले. समाजातील अंधश्रद्धा, वाईट रूढी, प्रथा यांना विरोध केला. समाज प्रबोधनाच्या तळमळीतून कीर्तने, अभंग, चरित्र लेखन इ. विपुल साहित्य निर्मिती केली.

शेवटपर्यंत साध्या राहणीचा पुरस्कार करणाऱ्या महाराजांनी माकनेर क्षेत्री समाजकल्याणासाठी मोठे धर्म कार्य उभे केले. आपला कोणी वारसदार महाराजांनी नेमला नाही. सर्व भक्त मंडळी हेच आपले वारसदार समजून त्यांच्यावर भविष्यकाळातील जबाबदारी टाकली.

**निष्कर्ष**

१.	आदर्श अशा मानवी समाजाच्या निर्मितीची प्रक्रिया वारकरी संप्रदायाच्या संस्कारामुळे सुरू झाली.

२.	वारकरी संप्रदायाच्या प्रभावातून अर्वाचीन कालखंडातील संतपरंपरा उदयास आली.

३.	मध्ययुगीन आणि अर्वाचीन संतमंडळींनी ईश्वरनिष्ठांची मांदियाळी निर्माण करून पारमार्थिक क्षेत्राबरोबरच समाज जीवनात देखील समता, स्वातंत्र्य, बंधुता या मूल्यांचा विकास केला.

४. माकनेरकर महाराज हे मध्ययुगीन व अर्वाचीन संतपरंपरेचे निष्ठावंत पाईक होते.

५. माकनेर हे क्षेत्र बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर या तालुक्याच्या अत्यंत दुर्गम अशा भागात आहे.

६. माकनेर हेच महाराजांचे कार्यकर्तृत्वाचे ठिकाण होते.

७. वडिलांकडून रामभक्ती तर आईकडून विठ्ठल भक्तीचे संस्कार मिळालेल्या महाराजांचे जीवन परमार्थपूर्ण असे आहे.

८. आदर्श गृहस्थाश्रमी जीवन जगत सर्वसामान्यांच्या प्रमाणे महाराजांनी आपल्या प्रपंचातील सर्व जबाबदाऱ्या पार पाडल्या होत्या.

९. महाराजांनी प्रपंचातून परमार्थ कसा साधता येतो हे दाखवून दिले आहे.

१०. महाराजांनी आपल्या आध्यात्मिक जीवनात कोणालाही गुरू करून घेतले नाही. तथापी त्यांनी वारकरी संप्रदायातील संतांच्या अभंग, कीर्तन इ. साहित्याचा अभ्यास करीत, ज्ञानमार्गाने तपश्चर्या करून आपले आध्यात्मिक जीवन संपन्न केले.

११. महाराजांनी समाजाचे प्रबोधन करण्यासाठी विपुल ग्रंथ संपदा निर्माण केली. याद्वारे महाराजांनी खऱ्या आध्यात्माची ओळख करून दिली. समाजातील अंधश्रद्धा, वाईट रूढी, प्रथा, परंपरा यांना विरोध केला.

१२. महाराजांच्या कालखंडापासून सुरू असलेले धार्मिक सोहळे, कीर्तने, भजन, उत्सव, दिंडी आजतागायत सुरू आहेत. महाराजांनी आपला कोणी उत्तराधिकारी नेमलेला नसल्यामुळे भक्तमंडळींच्या उत्स्फूर्त सहभागातून सर्व धार्मिक, सामाजिक उपक्रम आज अखेर सुरू आहेत.

**संदर्भ टीपा**

१. सरदार, गं. बा. : 'संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, आवृत्ती ४ थी, १९९२.

२. राजवाडे, वि. का. : तर्कतीर्थ जोशी लक्ष्मण (संपा.), राजवाडे लेख संग्रह, साहित्य अकादमी, प्रथमावृत्ती १९५८.

३. सरदार, गं. बा. : उनि, पृ. क्र.४५

४. सरदार, गं. बा. : उनि, पृ. क्र. ६०

५. डॉ. जोशी, प्र. न. : प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, आवृत्ती ३ पृ. क्र. १७३

६. डॉ. मंचरकर, र. बा. : धर्मसंप्रदाय आणि मध्ययुगीन मराठी वाङ्मय, प्रतिमा प्रकाशन, प्रथमावृत्ती ३१ डिसेंबर २०००, पृ. क्र. ३०

७. भोळे, भास्कर लक्ष्मण, : 'आधुनिकता आणि परंपरा' : एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्र, प्रा. फडके य. दि. गौरव ग्रंथ, व्होरा राजेंद्र (संपा.), प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २८ नोव्हेंबर, २०००, पृ. क्र. ८५

८. जोशी, ज. वा. व सौ. जोशी सु. ज. : 'अर्वाचिन संत गाथा', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती,१९९०, पृ. क्र. २०

९. डॉ. तुरंबेकर, व. ना. : 'अरुपाचे स्वरूप' (स्वामी स्वरूपानंद जीवन आणि वाङ्मय), अवधूत प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, ऑगस्ट १९९८.

१०. जोशी, ज. वा. व सौ. जोशी, सु. ज. : उनि, पृ. क्र. ७०

११. तत्रैव, श्री प्रज्ञानंद सरस्वती, पृ. क्र. २९५

१२. तत्रैव, श्री विष्णुदास महाराज, पृ. क्र. १७२

१३. तत्रैव, श्री कोटणीस महाराज, पृ. क्र. १८७

१४. तत्रैव, श्री अवधूत महाराज, पृ. क्र. २३६

१५. तत्रैव, श्री दासगणू महाराज, पृ. क्र.२२८

१६. तत्रैव, श्री बाबाजी महाराज, पृ. क्र. २७६

१७. तत्रैव, श्री तुकडोजी महाराज, पृ. क्र. ४०७

१८. कदम, स. भा. (संपा.) श्रीसंत चोखामेळा : चरित्र व अभंग, दुसरी आवृत्ती, १९९८

१९. भाकरे, तोताराम संपत, देशमुख आनंद महादेव : 'श्री समर्थ मारुती महाराज माकनेरकर यांचे ओवीबद्ध चरित्र' प्रकाशक – देशमुख के. जी. अध्यक्ष श्री संत मारुती महाराज ट्रस्ट संस्थान माकनेर, जि. बुलढाणा (महाराष्ट्र).प्रथम आवृत्ती १९७८, ओ. क्र. २५, अध्याय १ला, पृ. क्र. ०३

२०. तत्रैव, ओ. क्र. २५, अध्याय १ला, पृ. क्र. ०३

२१. तत्रैव, ओ. क्र. ५८ अध्याय १ ला, पृ. क्र. ०६

२२. तत्रैव, ओ. क्र. ७९ अध्याय, १ ला, पृ. क्र. ०६

२३. तत्रैव, ओ. क्र. १२७ अध्याय, १ला, पृ. क्र.१०

२४. तत्रैव, ओ. क्र. १४२ अध्याय, १ ला, पृ. क्र. १०

२५. तत्रैव, ओ. क्र. १५९ अध्याय, २ रा पृ. क्र. २६

२६. तत्रैव, ओ. क्र. १९५, अ. २ रा. पृ. क्र. २८

२७. तत्रैव, ओ. क्र. २०३, अध्याय, २ रा. पृ. क्र. २९

२८. तत्रैव, ओ. क्र. ३५, अध्याय, ३ रा. पृ. क्र. ३२

२९. तत्रैव, ओ. क्र. ४१, अध्याय, ३ रा. पृ. क्र. ३२

३०. डॉ. देवस्थळी रा. भा. 'डॉ. राधाकृष्णन यांचे शिक्षणविषयक विचार, सन्मित्र प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, १ ऑगस्ट १९८९ पृ. क्र. १५

३१. भाकरे, तोताराम संपत, देशमुख आनंद महादेव : 'श्री समर्थ मारुती महाराज माकनेरकर यांचे ओवीबद्ध चरित्र' उनी, ओ.क्र. ४८, अध्याय ३, पृ. क्र. ३३

३२. दांडेकर शं. वा. (संपा.), वारकरी पंथाचा इतिहास, १९५७, दुसरा सुमनहार, सत्कार्योत्तेजक सभा, धुळे, प्रथमावृत्ती, १९३८, पृ.क्र. २

३३. भाकरे, तोताराम संपत, देशमुख आनंद महादेव : 'श्री समर्थ मारुती महाराज माकनेरकर यांचे ओवीबद्ध चरित्र' उनी, ओ. क्र. ५४, अध्याय,३ रा पृ. क्र. ३४

३४. तत्रैव, ओ. क्र. ४८, अध्याय, ४ था पृ. क्र. ४९

३५. तत्रैव, ओ. क्र. ४३५, अध्याय, ४ था पृ. क्र. ४९

३६. इनामदार, हे.वी., 'संत एकनाथ दर्शन', (संपा.) कॉन्टिनेंटन्टल प्रकाशन, पुणे, १९८३, पृ.क्र. ४५

३७. वैद्य, श्री. म., प्रणवोपासना, वाङ्मयोपासक मंडळ, नगर, द्वितीय आवृत्ती, १९३९ पृ. क्र. ३८

३८. भाकरे, तोताराम संपत, देशमुख आनंद महादेव : 'श्री समर्थ मारुती महाराज माकनेरकर यांचे ओवीबद्ध चरित्र' उनी, ओ. क्र. २०५, अ. ९ वा. पृ. क्र. १३७

३९. तत्रैव, अध्याय, ३ रा पृ. क्र. ३५

४०. तत्रैव, ओ. क्र. १४८, अध्याय, ४ था. पृ. क्र. ५६

४१. श्रीसंत मारुती महाराज माकनेरकर यांची अभंग गाथा (मराठी), श्रीसंत मारुती महाराज माकनेरकर साहित्य प्रकाशन समिती, भक्तियोग साधना अभंग क्र. ४३, प्रथमावृत्ती, १४ सप्टेंबर, १९९०, पृ. क्र. ५०.

४२. भाकरे, तोताराम संपत, देशमुख आनंद महादेव : 'श्री समर्थ मारुती महाराज माकनेरकर यांचे ओवीबद्ध चरित्र' उनी, ओ. क्र. ११३, अध्याय, ३ रा. पृ. क्र. ३८

४३. तत्रैव, ओ. क्र. १२७, अध्याय, ३ रा. पृ. क्र. ३८

४४. तत्रैव, ओ. क्र. ११९, अध्याय, ३ रा. पृ. क्र. ३८

४५. तत्रैव, ओ. क्र. ६८, अध्याय, ४ था. पृ. क्र. ५१

४६. तत्रैव, ओ. क्र. ५८, अध्याय, ४ था. पृ. क्र. ५८

४७. श्रीसंत मारुती महाराज माकनेरकर यांची अभंग गाथा (मराठी), श्रीसंत मारुती महाराज माकनेरकर साहित्य प्रकाशन समिती, भक्तियोग साधना अभंग क्र. ४६

४८. तत्रैव, अभंग गाथा, भक्तियोग साधना, अभंग क्र. ५०

४९. तत्रैव, अभंग गाथा, भक्तियोग साधना, अभंग क्र. ३७

५०. तत्रैव, अभंग गाथा, भक्तियोग साधना, अभंग क्र. ४१

५१. तत्रैव, अभंग गाथा, भक्तियोग साधना, अभंग क्र. ४६

५२. तत्रैव, अभंग गाथा, भक्तियोग साधना, अभंग क्र. ४८

५३. डॉ. रानडे रा. द. तथा गुरुदेव रानडे, अनुवादक –प्रा. गजेंद्रगडकर कृ. वें., मराठी संत वाङ्मयातील परमार्थ मार्ग, द्वितीय आवृत्ती, प्रकाशन – सौ. गजेंद्रगडकर मधुवंती, पुणे, १९९३, प्र. क्र. ०१

५४. भाकरे, तोताराम संपत, देशमुख आनंद महादेव : 'श्री समर्थ मारुती महाराज माकनेरकर यांचे ओवीबद्ध चरित्र' उनी, ओळ क्र. ११२, अध्याय, ४ था, पृ. क्र. ५४

५५. तत्रैव, अध्याय, ५ वा, पृष्ट क्र. ३८

५६. तत्रैव, अध्याय ४ था, पृ. क्र. १००

५७. तत्रैव, ओवी क्र. १५८, अध्याय, ४ था, पृ. क्र. ५७

५८. श्रीसंत मारुती महाराज माकनेरकर यांची अभंग गाथा (मराठी), श्रीसंत मारुती महाराज माकनेरकर साहित्य प्रकाशन समिती, भक्तियोग साधना, अभंग क्र. २२

५९. भाकरे, तोताराम संपत, देशमुख आनंद महादेव : 'श्री समर्थ मारुती महाराज माकनेरकर यांचे ओवीबद्ध चरित्र' उनी, ओ. क्र. ४४, अध्याय, १० वा, पृ. क्र. १४३

६०. तत्रैव, ओ. क्र. ४८, अध्याय, १० वा, पृ. क्र. १४३

६१. तत्रैव, ओ. क्र. ५४ अध्याय, १० वा. पृ. १४४

६२. तत्रैव, ओ. क्र. २३ अध्याय, २० वा. पृ. २९६

६३. तत्रैव, ओ. क्र. १७७ अध्याय, ४ था. पृ. ५८

६४. तत्रैव, ओ. क्र. २७ अध्याय, ११ वा. पृ. १६०

६५. तत्रैव, ओ. क्र. ११ अध्याय, १५ वा. पृ. २२०

६६. तत्रैव, ओ. क्र. ७४ अध्याय, १५ वा. पृ. २२४

६७. तत्रैव, ओ. क्र. ७२ अध्याय, १५ वा. पृ. २२४

६८. तत्रैव, ओ. क्र. १०१ अध्याय, १५ वा. पृ. २२६

६९. तत्रैव, ओ. क्र. १०९ अध्याय, १५ वा. पृ. २२६

७०. तत्रैव, ओ. क्र. १७४ अध्याय, १५ वा. पृ. २३१

७१. तत्रैव, ओ. क्र. २३१ अध्याय, १५ वा. पृ. २३१

७२. तत्रैव, ओ. क्र. ११६ अध्याय, १३ वा. पृ. १९६

७३. तत्रैव, ओ. क्र. १५ अध्याय, ०८ वा. पृ. १०६

७४. तत्रैव, ओ. क्र. १४४ अध्याय, ८ वा. पृ. ११५

७५. तत्रैव, ओ. क्र. २२२ अध्याय, ८ वा. पृ. १२१

७६. तत्रैव, ओ. क्र. ७० अध्याय, १३ वा. पृ. १९७

७७. तत्रैव, ओ. क्र. ७० अध्याय, ११ वा. पृ. २९८

७८. तत्रैव, ओ. क्र. ७० अध्याय, ११ वा. पृ. २९९